cmyk

## संपादकीय

### ‘नापास’ धोरणाला पुन्हा ब्रेक!

शिक्षण क्षेत्रात टीकेचा विषय बनलेले, पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचे धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने रद्द केले आहे. केंद्र सरकारने मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०१० मध्ये सुधारणा करून ‘नो डिटेन्शन पॉलिसी’ संपवली आहे. त्यामुळे इयत्ता पाचवी ते आठवीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे पुढच्या वर्गात ढकलण्यात येणार नाही. नापास विद्यार्थ्यांना पुन्हा दुसऱ्यांदा परीक्षा देण्याची संधी दिली जाणार आहे. ते दुसऱ्यांदाही नापास झाले तरीही त्यांना शाळेतून काढले जाणार नाही. मात्र त्यांना त्याच वर्गात बसवले जाईल.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

### आपचा काँग्रेसला २४ तासांचा अल्टिमेटम!

दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी विरोधी इंडिया आघाडीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांच्यात कटुता वाढली आहे. आपने म्हटले आहे की, काँग्रेसला इंडिया आघाडीतून बाहेर करण्यासाठी आम्ही इतर पक्षांशी सल्लामसलत करू. काँग्रेसने अरविंद केजरीवाल यांच्यावर अस्तित्वात नसलेल्या कल्याणकारी योजनांची आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल आणि फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी काँग्रेसने तक्रार दाखल केली आहे. यामुळे आपने काँग्रेसवर नाराज व्यक्त केली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते अजय माकन यांनी आम आदमी पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे अँटी नॅशनल म्हणजेच देशविरोधी असल्याचे म्हटले आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४४ | शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# कापूस उत्पादकांना ५०० कोटी रुपयांचे अनुदान द्या!

## ‘सीएआय’ची केंद्र सरकारकडे मागणी, सुधारित वाण देण्याचीही केली सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

**देशात कापसाची उत्पादकता वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारने शेकऱ्यांना प्रतिकूल परिस्थितीत जास्त उत्पादकता देणारे वाण द्यावे. तसेच कापूस पिकात ठिबकचा वापर करण्यासाठी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी किमान ५०० कोटींची तरतूद करावी, अशी मागणी कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने सरकारकडे केली आहे.**



देशातील कापूस उत्पादन आणि उद्योगातील समस्या कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया (सीएआय)ने सरकारकडे मांडल्या आहेत. देशात ९५ टक्के कापूस बीटी आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून भारतात जीएम तंत्रज्ञानात कोणतीही सुधारणा करण्यात आली नाही. त्यामुळे गुलाबी बोंडअळीने जीएम कापूस बियाण्याला प्रतिकार विकसित केला आहे. देशातील कापूस उत्पादकता कमी असण्यामागे हे देखील एक कारण आहे. भारतीय संशोधकांनी असेही सांगितले की, कोरडवाहू क्षेत्रात जे जास्त कालावधीचे वाण वापरले जाते त्यावर ◀◀ पान २ वर

### » महाराष्ट्रात ९५ टक्के कापूस कोरडवाहू क्षेत्रात

पिकाला आवश्यक त्या वाढीच्या काळात पाणी मिळत नसल्याने कोरडवाहू पिकाची उत्पादकता कमी असते. महाराष्ट्रात जवळपास ९५ टक्के कापूस पीक कोरडवाहू क्षेत्रात घेतले जाते. तर मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक आणि गुजरात राज्यातही कापूस पिकाला सिंचनासाठी पाण्याची टंचाई भासते. पूर्ण हंगाम भागत नाही. याचा फटका या राज्यांतील शेतकऱ्यांना बसत असतो.

### » ठिबकसाठी ५०० कोटी अनुदानाची तरतूद करा

अतूल गणात्रा यांनी सांगितले की, कोरडवाहू आणि अर्ध सिंचन असलेल्या शेतकऱ्यांच्या समस्येवर ठिबकच्या माध्यमातून तोडगा काढता येईल. पिकात ठिबकचा वापर केल्यास उत्पादकता वाढीसाठी मदत होईल. आम्ही सरकारला विनंती केली की सरकारने या शेतकऱ्यांना मदत ठिबकसाठी अनुदान द्यावे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी. कारण ठिबक बसवण्यासाठी जास्त खर्च येत असतो. हा खर्च पूर्णपणे शेतकऱ्यांना झेपणारा नाही. पण सरकारने अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद केली तरी शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल.

# माझ्या जवळे असले तरी सर्वांना फाशी द्या

## संतोष देशमुख खून प्रकरणावर धनंजय मुंडे यांची रोखठोक भुमिका; मुख्यमंत्र्यांचीही घेतली भेट



**मुंबई । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणातील सर्वांना फाशी द्यायला हवी, असे सांगून मुंडे म्हणाले, या घटनेत व त्या मागे कोणीही, अगदी माझ्या जवळचे असले तरी त्यांना शिक्षा व्हायला हवी, अशी रोखठोक भुमिका अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी घेतली. दरम्यान मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये चर्चा झाली असल्याचे समजते.**

धनंजय मुंडे यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली. या भेटीनंतर धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी मुंडे म्हणाले, मुख्यमंत्र्यांची भेट योगायोगाने झाली. बीडमध्ये संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाली ही हत्या ज्याने कोणी केली, त्याच्यावर कारवाई व्हायला हवी. त्याला फाशी व्हायला पाहिजे, या मताचा मी आहे. संतोष देशमुख हा माझ्या जिल्ह्यातील एक सरपंच आहे. मलाही त्याच्या बाबतीत तितकाच आदर आहे. जे कोणी यात गुन्हेगार आहे, त्या सर्वांना फाशीची शिक्षा करा, मग ते कोणीही असो. कुणाच्याही कितीही जवळचे असो, मग तो माझ्याही जवळच असो. त्यालाही सोडायचा नाही, असे धनंजय मुंडे म्हणाले.

### सीआयडीचे पथक बीड जिल्ह्यात तळ ठोकून

**महासंचालकांनी मस्साजोग येथे भेट देऊन केली पाहणी**

बीड-सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणासह एकून तीन गुन्हे सीआयडीकडे वर्ग करण्यात आले असून सीआयडीचे महासंचालक गुरुवारी बीडमध्ये आले. सर्वप्रथम पथकाने पोलिस अधिक्षक कार्यालयात जावून घटनेची सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर सीआयडी पथकाने मस्साजोग येथे जावून घटनेची माहिती घेऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्या सोबत पोलिस अधिक्षक नवणीत काँवत हे होते.

संतोष देशमुख खून प्रकरणाचे पडसाद संपुर्ण राज्यात उमटत असून दि. २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये भव्य मोर्चा निघणार आहे. प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेचा तपास सीआयडीकडे वर्ग केला आहे. संतोष देशमुख खून प्रकरण, पवनचक्की खंडणी प्रकरण आणि पवनचक्की कंपनीच्या सुरक्षा रक्षक मारहाण हे तीन गुन्हे सीआयडीकडे वर्ग करण्यात आले आहेत. सीआयडीचे अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पाटील हे अगोदरच बीड जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. गुरुवारी सीआयडीचे अप्पर पोलिस महासंचालक प्रशांत बोरुडे हे बीडमध्ये आले. त्यांनी अगोदर पोलिस ◀◀ पान २ वर

### चौकशी पारदर्शकपणे व्हायला पाहिजे

पण फक्त राजकारणासाठी माझ्यावर आरोप करणे, याच्यामागे काय राजकारण असू शकते, हे आपण समजू शकता. वाल्मिक कराड यांची जवळीक सुरेश धस यांच्यासोबत होती. ते माझ्याही जवळचे आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याची चौकशी सुरु आहे. ही चौकशी पारदर्शकपणे व्हायला पाहिजे मी देखील या मताचा आहे. पण माझ्याविरोधात सकाळी सकाळी बोलल्याशिवाय जर तुमचा दिवस उजडत नसेल, तर त्यासाठी आपण काहीही करु शकत नाही, असे धनंजय मुंडेंनी म्हटलऄ.

### ९९ अपराध यांनी पचवले, संतोष देशमुख १०० वा-आ. धस



आष्टी-या लोकांनी ९९ अपराध यांनी याआधी पचवले आहे, संतोष देशमुख १०० वा होता अशी टीका भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

### चार्जशीट लवकर दाखल व्हायला हवी

मिडिया ट्रायलमध्ये माझं नाव खराब करण्यासाठी मंत्रिपदाची शपथ घ्यायच्या आधीपासून, मंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर, विभाग कोणता मिळावा, कोणता मिळू नये यासाठी आणि त्यानंतर बीडचे पालकमंत्रीपद कोणी घ्यावे, कुणी घेऊ नये हा सर्व विषय मी माझ्या पक्षाचे नेतृत्व अजित पवारांकडे दिला आहे. या प्रकरणाची चौकशी गतीने सुरु आहे. लवकरात लवकर ही चौकशी व्हावी. इतकेच नव्हे तर हे प्रकरण फार भयंकर आहे. त्यामुळे याचा खटला फास्ट ट्रक कोर्टात चालावा. चार्जशीट लवकर दाखल व्हायला हवी. याप्रकरणी ज्या गोष्टी निष्पन्न होतात, त्या कोर्टात लगेचच समोर आल्या पाहिजेत, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

### महायुतीच्या दोन बड्या नेत्यांकडून सूचक वक्तव्य

मुंबई-सध्या राज्यात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण चांगलेच गाजत आहे, या प्रकरणावरून विरोधकांकडून मंत्री धनंजय मुंडे यांच्या कोंडीचा प्रयत्न सुरू आहे. त्यातच आता महायुतीच्या दोन बड्या नेत्यांकडूनही यावर सूचक विधान करण्यात आले आहे. याबाबत बोलताना मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले की, धनंजय मुंडे यांच्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील. यावर आम्ही भाष्य करणं योग्य नाही असे महाजन यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील अशीच प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडे यांच्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील असे मुश्रीफ यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता चर्चेला उधाण आले आहे.

### गोळीबार करणारा फड पोलिसांच्या ताब्यात

बीडः हवेत गोळीबार करून त्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करणाऱ्या परळी येथील कैलास फड यास पोलिसांनी गुरूवारी दि.२६ रोजी ताब्यात घेतले आहे. दरम्यान, त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी देण्यात आली आहे. परळी शहर पोलिसांत दोन दिवसांपुर्वीच त्याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. त्याच्या जवळील रिवॉल्वर देखील जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

परळी येथील आरोपी कैलास बाबासाहेब फड याचा त्याच्याकडील परवाना प्राप्त असलेल्या रिव्हॉल्वरमधून हवेत फायर केल्याचा एक व्हिडिओ सोशल मिडीयावर चांगलाच व्हायरल झाला होता. सदरची घटना ही सुमारे एक वर्षापुर्वीची असून त्याने त्याच्या घरासमोरील वाहनाची पुजा करतांना हवेत फायर केल्याची माहिती तपासात मिळाली आहे. आरोपी कैलास फड याने जिल्हाधिकारी यांच्या शस्त्र परवान्यातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन रिव्हॉल्वर मधून हवेत फायर केल्याने त्याच्याविरुद्ध पोलीस शिपाई विष्णू फड यांच्या फिर्यादीवरून दोन दिवसापूर्वीच परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यास दि. २६ डिसेंबर ◀◀ पान २ वर


### परभणी व बीड प्रकरण दाबण्याचा प्रयत्न- पटोले

बेळगाव : परभणी व बीडमधील घटनांवर सर्व स्तरातून कारवाईची मागणी केली जात असताना भाजपा युती सरकार मात्र गंभीर नसल्याचे दिसत आहे. सरकार कारवाईची भाषा करत ◀◀ पान २ वर

## दै.लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांना मुकनायक पुरस्कार जाहीर

**बंडु खांडेकर यांचा समावेशः माजलगाव भुषण पुरस्काराने विविध मान्यवरांचा होणार सन्मान**





**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देण्यात येणार असुन यंदा या पुरस्काराचे ६ वे वर्षे असुन यावर्षीच्या मुकनायक पुरस्कारासाठी बीड/पुणे येथील दै राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडी चे संपादक बंडु खांडेकर यांना जाहिर झाला असुन माजलगाव भुषण पुरस्कार तालेब चाऊस, सुनिल रुद्रवार, डॉ. दिनकर मस्के, अंबादास रोकडे, बाळासाहेब कदम, ऑड. टी. एन .कोल्हे, सरपंच अजय शिंदे, तलाठी नारायण थापडे, ग्रामसेवक हानुमंत राऊत यांना जाहिर करण्यात आले असुन या पुरस्काराचे वितरण मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहीती माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतिराम पाढरपोटे यांनी ◀◀ पान २ वर

## ‘ती’ हत्या केवळ स्व.संतोष यांची नाही, माणुसकीची सुध्दा झालीये!

**२८ तारखेला मोर्चात सहभागी व्हा-आ.संदीप क्षीरसागर**



**बीड । प्रतिनिधी**

दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांची हत्या होऊन तब्बल १५ दिवस उलटले आहेत. या गुन्ह्याचा तपास तीन वेगवेगळ्या यंत्रणांकडे गेला तरीही अद्यापपर्यंत आरोपी अटक नाहीत. वारंवार लोकप्रतिनिधी आणि सामान्यांकडून कॉल रेकॉर्डस तपासण्याची मागणी करत असतानाही मुख्य सुत्रधाराला वाचविण्यासाठी असे केले जात नाही. मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड आहे, हे संपूर्ण जिल्ह्याला माहीती आहे. परंतु ते एका सत्ताधार्याचा उजवा हात असल्याने त्यांना पाठीशी घातले जात आहे. या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि जिल्ह्यात वाढणार्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीडमध्ये शनिवारी (दि.२८) रोजी आयोजित केलेल्या सर्वसमावेशक मूक मोर्चामध्ये सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि जिल्ह्यातील सर्वसामान्य लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड : ०.५० क्विंटल | २,३०१ | २,३०१ | २,३०१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १७.५० क्विंटल | ७,४०० | ७,६१० | ७,४५२ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,२०६ | ३,००० | २,६३९ |
| मुग : ६.५० क्विंटल | ६,९१० | ६,९१० | ६,९१० |
| सोयाबीन: १३७.५० क्विंटल | ३,९०० | ४,१२५ | ४,०५६ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# नद्यांना प्रदुषण मुक्त करण्यासाठी पंतप्रधान, केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांची भेट घेणार

## पदभार घेण्यापूर्वी ना.पंकजाताई मुंडे कोल्हापूर महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे उद्या शुक्रवारी (ता. २७) आपल्या मंत्रालयीन दालनात पदभार घेऊन कामकाज सुरू करणार आहेत. पदभार घेण्यापूर्वी त्यांनी आज कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मीचे दर्शन घेतले. मला जे खाते मिळाले आहे ते सृष्टीला वाचवण्यासाठीचे आहे, त्यामुळे जास्तीत जास्त चांगलं योगदान मी यात देणार आहे. पर्यावरणाच्या माध्यमातून नद्यांना प्रदुषण मुक्त करण्यासाठी पुढाकार घेणार आहे, यासाठी लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



ना. पंकजाताई मुंडे आज कोल्हापूर दौर्यावर होत्या. सकाळी त्यांनी श्री महालक्ष्मी मंदिरात जाऊन अंबाबाईचे दर्शन घेतले. तत्पूर्वी विमानतळावर त्यांचं आ. अमल महाडिक व भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केलं. दर्शनानंतर प्रदुषण नियंत्रण व पशुसंवर्धन अधिकाऱ्यांसोबत त्यांनी आढावा बैठक घेतली. याप्रसंगी माध्यमांशी ◀◀ पान २ वर

### “ संतोष देशमुख माझा बुथप्रमुख, लेकराला न्याय मिळेल

मस्साजोग येथील संतोष देशमुख हत्येप्रकरणी पत्रकारांनी विचारले असता ना. पंकजाताई म्हणाल्या, या हत्येची एसआयटी चौकशी करावी अशी मागणी सर्वात पहिल्यांदा कुणी केली असेल तर ती मी मुंडे साहेबांच्या जयंतीदिनी १२ डिसेंबरला गोपीनाथ गडावर केली. या क्रुर प्रकाराचा मी तीव्र संताप व निषेध केला आहे. मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यात जातीने लक्ष घालून न्याय्य भूमिका घेवून त्यांना न्याय देतील. संतोष देशमुख माझा बुथप्रमुख होता, सरपंच म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे, देशमुख कुटुंबियांना नक्की न्याय मिळेल असं त्या म्हणाल्या.

cmyk

## अग्रलेख

# 'नापास' धोरणाला पुन्हा ब्रेक!

शिक्षण क्षेत्रात टीकेचा विषय बनलेले, पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचे धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने रद्द केले आहे. केंद्र सरकारने मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०१० मध्ये सुधारणा करून 'नो डिटेन्शन पॉलिसी' संपवली आहे. त्यामुळे इयत्ता पाचवी ते आठवीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढे पुढच्या वर्गात ढकलण्यात येणार नाही. नापास विद्यार्थ्यांना पुन्हा दुसऱ्यांदा परीक्षा देण्याची संधी दिली जाणार आहे. ते दुसऱ्यांदाही नापास झाले तरीही त्यांना शाळेतून काढले जाणार नाही. मात्र त्यांना त्याच वर्गात बसवले जाईल.

हा नियम केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने लागू केलेला असला तरी महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार असल्याने तो लवकरच राज्यातही लागू होण्याची शक्यता आहे. २०१० मधील शिक्षण हक्क कायद्याच्या 'नो डिटेन्शन' धोरणानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला नापास करता येत नाही किंवा शाळेतून काढूनही टाकता येत नाही. परीक्षेत अनुत्तीर्ण होऊनही आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात बढती देण्याची तरतूद आहे. त्यामुळे शिक्षणाचा स्तर हळूहळू घसरत असल्याचे दिसून आले होते. त्याचा परिणाम दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांवर होऊ लागला होता. या विषयावर बराच काळ विचारविनिमय केल्यानंतर आता नियमात बदल करण्यात आला आहे. सरकारच्या नव्या अधिसूचनेनुसार इयत्ता पाचवी ते आठवीमधील विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्याची परवानगी शाळांना देण्यात आली आहे. मात्र, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना दोन महिन्यांत फेरपरीक्षेची संधी दिली जाणार आहे. या परीक्षेत ते पुन्हा नापास झाले तर त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार नाही. पण ते ज्या वर्गात शिकत होते त्याच वर्गात पुन्हा अभ्यास करावा लागेल. आठवीपर्यंतच्या अशा मुलांना शाळेतून काढून टाकले जाणार नाही, अशीही तरतूद सरकारने केली आहे. केंद्र सरकारच्या नव्या धोरणाचा परिणाम केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिक शाळांसह तीन हजारहून अधिक शाळांवर होणार आहे. शिक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार शालेय शिक्षण हा राज्याचा विषय आहे. त्यामुळे राज्ये या संदर्भात स्वत:हून निर्णय घेऊ शकतात. जुलै २०१८ मध्ये शिक्षणाच्या अधिकारात सुधारणा करणारे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते. यामध्ये शाळांमध्ये लागू करण्यात आलेली 'नो डिटेन्शन पॉलिसी' रद्द करण्याबद्दल चर्चा होती. त्यानुसार पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या नियमित परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली होती. यासोबतच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची दोन महिन्यांत फेरपरीक्षा घेण्याचा मुद्दा मांडण्यात आला होता. २०१९ मध्ये हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. यानंतर राज्य सरकारांना 'नो डिटेन्शन पॉलिसी' काढून टाकण्याचा किंवा तो लागू ठेवण्याचा अधिकार देण्यात आला होता. पाचवी आणि आठवीमध्ये नापास झाल्यास त्यांना बढती द्यायची की पुन्हा त्याच वर्गात ठेवायचे, हे राज्य सरकार ठरवू शकत होते. त्यानंतर गुजरात, आसाम, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेशसारख्या १६ राज्ये आणि दिल्ली व पुद्दुचेरी या दोन केंद्रशासित प्रदेशांनी 'नो डिटेन्शन' धोरण रद्द केले. हे धोरण चालू ठेवणाऱ्या राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेशसारख्या काही राज्यांचा समावेश होता. २०१९ मध्ये हे दुरुस्ती विधेयक मंजूर झाले. त्यानंतर लगेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची घोषणा झाली. त्यामुळे त्याला समग्र स्वरूप देण्यासाठी, ते पूर्णपणे लागू करण्यास विलंब करण्यात आला. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार झाल्यावर पुन्हा नियमात सुधारणा करण्यात आली. त्यानुसार आता अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या पाठांतराऐवजी सर्वांगीण विकासावर भर देण्यात येणार आहे. परीक्षाही सक्षमतेनुसार घेतली जाणार आहे. नवीन नियमानुसार प्राथमिक शिक्षणामध्ये महत्त्वपूर्ण धोरणात्मक बदल करण्यात आले आहेत. शिक्षणातील तफावत दूर करण्यासाठी वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या पालकांशी संवाद साधणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सुधारण्यास मदत करण्यासाठी शिक्षक मूल्यांकनावर आधारित विशेष लक्ष देतील. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची नोंद ठेवली जाणार असून त्यांच्या प्रगतीचे बारकाईने निरीक्षण केले जाणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेन्शन पॉलिसी संपुष्टात आणत दीर्घकाळापासून सुरू असलेली व्यवस्था बदलली आहे. या निर्णयामुळे आता पाचवी ते आठवीच्या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाणार नाही. मुलांमधील शिकण्याची क्षमता सुधारणे आणि शैक्षणिक कामगिरी उंचावणे हे हा निर्णय घेण्यामागचे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे सरकारने म्हटले आहे.

१६ डिसेंबरपासून नवीन 'शिक्षण हक्क कायदा सुधारणा नियम २०२४ ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. शिक्षण हक्क कायदा २०१९ मध्ये सुधारणा केल्यानंतर देशातील १६ राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी पाचवी व आठवीत 'नापास न करण्याचे धोरण' ठरवले होते. आता हेच धोरण केंद्राने रद्दबातल ठरवले आहे. नव्या धोरणामधून विद्यार्थी आणि शिक्षकांना अभ्यासाप्रती अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील त्रुटी ओळखून त्यांना अतिरिक्त मदत केली पाहिजे. सर्व प्रयत्न करूनही विद्यार्थ्यांना नापास करणे गरजेचे असल्यास ते करायला हवे. परीक्षा प्रक्रिया ही घोकंपट्टीऐवजी सर्वंकष विकासावर केंद्रित असेल. मुलांमधील शिक्षणाच्या क्षमतेमध्ये होत असलेली घसरण थांबवण्यासाठी केंद्र सरकारने परीक्षेच्या 'नापास' धोरणावर बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. हे खरे असले तरी धोरणातील धरसोडपणा विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो, हा धोकाही सरकारने लक्षात घ्यायला हवा.

# महाराष्ट्रातल्या सर्व शस्त्र परवान्यांची चौकशी लावा

## अंजली दमानिया यांची मागणी; धनंजय मुंडेंचा पिस्तुलधारी फोटो व्हायरल

**मुंबई । प्रतिनिधी**

**अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचाही पिस्तुल हातात घेतलेला फोटो देखील अंजली दमानिया यांनी शेअर केला आहे. अंजली दमानिया यांनी बीड येथील अनेक तरुणांचे हातात रिव्हॉल्वर घेतलेले फोटो शेअर केले आहेत. तसेच महाराष्ट्रातील सर्व शस्त्र परवान्यांची चौकशी करण्याची मागणी दमानिया यांनी केली आहे.**



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर बीड येथील वाढत्या गुंडगिरीची चर्चा सुरु आहे. यासंदर्भात संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी शनिवारी २८ डिसेंबर रोजी विरोधी पक्षांनी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणात आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील उडी घेतली आहे. एक जिल्ह्यात सर्वाधिक शस्त्र परवाने वाटल्याचा आरोप मागे भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी विधीमंडळात केला होता. आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोशल मिडीयावर तरुणांच्या हातातील रिव्हॉल्वर घेतलेले फोटो व्हायरल झालेले फोटो ट्वीट केले आहेत. हा महाराष्ट्र छत्रपती शिवरायांचा आहे, गुंडांचा नाही असेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. राज्यातील सर्व शस्त्रास्त्र परवान्याची चौकशी लावावी आणि गरज नसलेल्यांचे परवाने तातडीने रद्द करावेत अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

# बीडमधील अपहरण प्रकरणात मोठा ट्विस्ट, भाजप आ. सुरेश धस अडचणीत येणार?

**पाटोदा । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर, व्यापारी अमोल डुबे यांचे परळीमधून अपहरण करण्यात आले होते. या प्रकरणामध्ये आता मोठा ट्विस्ट आला आहे. अपहरण झालेल्या व्यापाऱ्याने सुरेश धस यांच्यावरच टीका केली.**

केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून हत्या करण्यात आली होती. त्याच दिवशी परळी तालुक्यातील एका व्यापाऱ्याचे अपहरण झाले होते. या दोन्ही घटनांवरून भाजपचे आष्टचे आमदार सुरेश धस यांनी आवाज उठवला होता. सुरेश धस यांनी देशमुखांच्या प्रकरणात आरोपींचा आका मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे मानले जाणारे वाल्मिक कराड असल्याचं उघडपणे ते आता बोलत आहेत. मात्र यामधील परळीत ज्या व्यापाऱ्याचे अपहरण झाले होते त्याने धस यांनी राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार केला असल्याचं व्यापारी अमोल डुबे यांनी म्हटलं आहे ९ डिसेंबरला काही गुन्हेगारांनी माझे अपहरण केले होते. त्यानंतर माझ्या कुटुंबाने संपर्क करताच धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी पोलिसांना सूचना करून माझी लवकरात लवकर सुटका केली. मात्र या घटनेचा आधार घेत सुरेश धस यांनी पीडीत डुबे कुटुंब त्यांना भेटायला जाणार, किती रुपयात सेंटलमेंट झाली अशी चुकीची माहिती माध्यमांना देत आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार केला असल्याचे मत परळीतील अपहरण



प्रकारणातील पीडित व्यापारी अमोल डुबे यांनी व्यक्त केला आहे. आमचे दोन पिढ्यांपासून मुंडे कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. नेहमी एकमेकांच्या सुख-दुःखात आम्ही सहभागी असतो. त्यामुळे आमच्या कुटुंबावर संकट येताच मुंडे कुटुंबाने आमची मदत केली. पोलिसांनी माझी तातडीने सुटका तर केलीच शिवाय अवघ्या पाच दिवसात गुन्ह्यातील आरोपींना मुद्दे-मालासह अटक केले, याबद्दल आम्ही पोलिसांचे जाहीर आभार देखील व्यक्त केले आहेत. मात्र या घटनेच्या आडून आ.सुरेश धस हे आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असून, त्यांनी आम्ही त्यांना भेटणार वगैरे अशा स्वरूपाची अत्यंत चुकीची आणि धादांत खोटी माहिती माध्यमांना दिली असून, आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांनी डुबे व मुंडे कुटुंबाच्या अनेक वर्षांच्या संबंधात वितुष्ट आणू नये, असे आवाहनही अमोल डुबे यांनी केले. सुरेश धस यांच्या माध्यमांवरील पेरल्या जात असलेल्या विविध बतावणींच्या अनुषंगाने ही एक चपराक असल्याचे मानले जात आहे.



**बीड – सीआयडीचे महासंचालक प्रशांत बोरुडे यांची भेट घेऊन संतोष देशमुख खून प्रकरणाचा तपास गतीने करण्याची मागणी केली. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, राजेंद्र मस्के, तालुकाप्रमुख गोरख सिंघण, वैजनाथ तांदळे उपस्थित होते.**

# हॉस्टेलमधून पळाल्यावर मिळेल त्याने केला बलात्कार

## घटनाक्रम ऐकून आई-वडिलांसह पोलीसही हादरले

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**अभ्यासाचा ताण, आई-वडिलांचा दबाव आणि नीट परीक्षेचे ओझं याला कंटाळून एक अल्पवयीन मुलगी संभाजीनगर येथील हॉस्टेल सोडून पळून गेली. मात्र या एका चुकीमुळे तिला आयुष्यभरासाठी मोठी किंमत मोजावी लागली आहे. रस्त्यात मिळेल त्याने तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला असून मुलीला मोठा मानसिक धक्का बसला आहे.**

तरुणी नीट परीक्षेची तयारी करत होती. तिला डॉक्टर व्हायचे होते आणि यासाठी अभ्यास सुरू होता. मात्र अभ्यासाचे ओझे इतके की ते तिला सहन होत नव्हते. त्यातून घरच्यांचाही दबाव यामुळे ती वैतागली होती. यामुळे सगळे सोडून ती निघून गेली. आई-वडिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी मुलीचा शोध घेतला आणि पुण्यातुन तिला संभाजीनगरमध्ये आणले. मात्र त्यानंतर या मुलीने जी आपबीती सांगितली त्यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला. तिचे आई वडील तर ढसाढसा रडायला लागले, एक छोटीशी चूक या मुलीला आयुष्याचा धडा शिकवणारी ठरली. या सर्व काळात तब्बल ४ जणांनी या मुलीवर मदतीच्या बहाण्याने अत्याचार केला होता. पोलिसांनी सर्वांनाच पकडून आता गजाआड केले आहे.

# चार जिल्ह्यांना गारपीटीचा ऑरेंज अलर्ट; मराठवाड्यात पावसाला पोषक हवामान

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात पुढील दोन दिवस बहुतांश जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार ते मध्यम पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. पावसाला पोषक हवामान झाल्याने राज्यातून थंडी गायब झाली आहे.

शुक्रवारी मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीटीचा ऑरेंज अलर्ट तर विदर्भ आणि मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजासह जोरदार पावसाचा येलो अलर्ट हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. राज्यात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या सरी पावसाची शक्यता आहे. तर उद्या धूळे, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजासह गारपीटीचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच नंदुरबार, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, वाशिम, यवतमाळ, नागपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस तर अकोला, अमरावती बुलढाणा, वर्धा जिल्ह्यात वादळी वारे विजांच्या लखलखटासह तुरळक ठिकाणी गारपीटीचा इशारा हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.

## पान १ वरून...

### कापूस उत्पादकांना ५००

गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे आता शेतकऱ्यांना स्थानिक वातावरणाला पुरक, स्थानिक किड-रोगांना प्रतिकार करणारे आणि तापमान, दुष्काळ अशा संकटातही तग धरणारे वाण की ज्याची उत्पादकता अधिक आहे आणि धाग्याची गुणवत्ताही चांगली आहे, असे वाण देण्याची वेळ आली आहे. आपल्याला जास्त उत्पादकता असलेल्या देशांशी नाही पण किमान जगाच्या सरासरी उत्पादकतेच्या पातळीवर पोहचावे लागेल. त्यासाठी शेतकऱ्यांना आधुनित तंत्रज्ञानयुक्त वाण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. देशातील कापसाची हेक्टरी उत्पादकता खूपच कमी आहे. याचा फटका आपल्या शेतकऱ्यांना बसत आहे. देशातील एकूण उत्पादनापैकी तब्बल ६७ टक्के कापूस उत्पादन कोरडवाहू होते. कोरडवाहू क्षेत्रात पीक पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. मात्र पिकाला नेमकं फूल आणि बोंड लागण्याच्या काळातच पाण्याची टंचाई भासते. नेमके याच काळात पिकाला जास्त पाण्याची गरज असते. कापूस पिकाला जेवढ्या पाण्याची आवश्यकता असते त्यापैकी तब्बल ८० टक्के पाणी फुले आणि बोंडे लागण्याच्या काळात असते. पण पाणीटंचाईमुळे उत्पादकतेवर परिणाम होतो, असे कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष अतूल गणात्रा यांनी सांगितले.

------------

### गोळीबार करणारा फड

२०२४ रोजी दुपारी अटक करण्यात आली. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी चोरमले, पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली वाय. बी. शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पो.स्टे. परळी शहर हे करीत आहेत.

-----------

### माझ्या जवळे असले तरी

अधिक्षक कार्यालयास भेट देऊन घटनेची माहिती जाणून घेतली. त्यानंतर ते आपल्या पथकासह मस्साजोग येथे गेले. तेथे त्यांनी पाहणी करुन माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांच्या सोबत पोलिस अधिक्षक नवणीत काँवत हे होते. घटनेचा तपास गतीने केला जणार असल्याचा त्यांनी यावेळी विश्वास दर्शवला.

---------

### परभणी व बीड प्रकरण

असले तरी सरकार वस्तुस्थिती मान्य करायला तयार नाही, त्यामुळे चौकशीतून उत्तर काय मिळणार हे माहित आहे, असे सांगून बीड व परभणी हत्या प्रकरण दाबण्याचा मुख्यमंत्र्यांकडून प्रयत्न होत असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या दोन दिवसांच्या नव सत्याग्रह कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बेळगावात पोहचले असताना प्रसार माध्यमांशी ते बोलत होते. नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, परभणीत आंबेडकरी विचारांच्या सुशिक्षित तरुणाचा पोलीस मारहाणीत झालेला मृत्यू हा पोलिसांनी केलेली हत्याच आहे. बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या केली, या दोन्ही घटनांवर जनतेने व सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी वस्तुस्थिती मांडली आहे पण भाजपा युती सरकार ते मान्य करत नाही, हे सरकार प्रायोजित असल्याने सीआयडी चौकशी केली तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही असे पटोले म्हणाले. शेवटी बोलताना नाना पटोले म्हणाले की, देशात हुकूमशाही सुरु असून सध्या देशात काय चालले आहे हाच प्रश्न सर्वांनाच पडला आहे. देशातील या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बेळगावात होत असलेले अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन हे काँग्रेस पक्षासाठी तसेच देशवासीयांसाठी अत्यंत महत्वाचे असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

-----------

### 'ती' हत्या केवळ स्व.संतोष यांची

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय हत्या ही केवळ एका व्यक्तीची नव्हे तर अक्षरशः माणुसकीची हत्या आहे. इतक्या क्रुरपणे मारले जाते. एखाद्या चित्रपटात ज्याप्रकारे अतिशयोक्तीपूर्णतेने खलनायक पात्र कोणाला तरी मारत असते त्यापेक्षाही कैक पटीने बिभत्स प्रकारे स्व.संतोष देशमुख यांना मारले जाते. आणि हे इतके गंभीर प्रकरण असताना १५ दिवस उलटूनही या गुन्ह्यातील आरोपी आणि सुत्रधाराला अटक केली जात नसेल, केवळ ते एका सत्ताधाऱ्याच्या राजाश्रयाला असल्यामुळे! किती संतापजनक प्रकार आहे हा! हा प्रकरण म्हणजे केवळ स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचे नाही, तर माणुसकीच्या हत्येचे आहे. त्यामुळे पुन्हा कोणाचा संतोष देशमुख होऊ द्यायचा नसेल तर २८ डिसेंबर रोजी होणार्या सर्वसमावेशक मोर्चात सहभागी व्हा, असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. या मोर्चाला सर्व राजकीय पक्षांचे जेष्ठ नेते, सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सर्वसामान्य जिल्हावासीय मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

**असा असेल मोर्चाचा मार्ग**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात होईल. त्यानंतर माळीवेस, सुभाष रोडवरून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चाचा मार्ग असेल.

**याठिकाणी असेल पार्किंगची व्यवस्था**

खंडेश्वरी मंदीराच्या समोरील क्रिडांगण एमआयडीसी परिसर, फटाका मैदान मोंढा रोड परिसर, शासकीय आयटीआय परिसर,जुनी व नवी पंचायत समिती परिसर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड परिसर, माने कॉम्प्लेक्स परिसर, जिल्हा रूग्णालयाच्या मागील बिंदुसरा रेस्ट हाऊस परिसर, निळकंठेश्वर मंदिर परिसर, कनकालेश्वर मंदिर परिसर, बिंदुसरा नदीपात्र परिसर, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसर, छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण परिसर (स्टेडियम), छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) रिलायन्स पेट्रोल पंपाच्या पाठीमागील परिसर.

---------------

### दै.लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाश

प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारीता क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारासह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्या, आरोग्य रुग्ण सेवा,उद्योजक, सहकारासह इतर क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्ह्याच्या व माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या पाच वर्षापासून सन्मानीत करण्यात येते.यंदा या पुरस्काराचे ६ वे वर्ष असुन यावर्षी पत्रकारीतेतील योगदानाबद्दल दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडी चे संपादक बंडु खांडेकर यांना जाहीर करण्यात आला असुन, माजलगाव भुषण पुरस्कारा मध्ये माजी नगरसेवक तालेब चाऊस (सामाजिक),श्री सिद्धेश्वर अर्बन बँकेंचे चेअरमन सुनील रुद्रवार (सहकार),न्युट्री जॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष अंबादास लक्ष्मणराव रोकडे सर (उद्योग),मस्के सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.दिनकर मस्के (आरोग्य), माजलगाव तालुक्यातील कोथ्रुळ येथील भुमीपुत्र तथा लातुर येथील समर्पण बॉईज ॲन्ड गर्ल्स हॉस्टेलचे संचालक बाळासाहेब संदिपानराव कदम (भुमी पुत्र), माजलगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील ॲड.टि.एन.कोल्हे (विधीज्ञ),मालीपारगाव ग्रामपंचायतीचे सरपंच अजय शिंदे (आदर्श सरपंच),केसापुरी तलाठी सज्जाचे तलाठी रामेश्वर नारायण थापडे (उत्कृष्ट तलाठी),देपेगाव, सांडस चिंचोली ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक हानुमंत राऊत (उत्कृष्ट ग्रामसेवक) यांना माजलगाव भुषण पुरस्कार जाहीर झाले असुन मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे वितरण लवकरच मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध नामांकित मान्यवरांच्या उपस्थितीत भव्यदिव्य कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतिराम पाढरपोटे,पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार राजेभाऊ पाष्टे,पत्रकार नय्युम आत्तार,पत्रकार वसंत परसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

---------

### नद्यांना प्रदुषण मुक्त करण्यासाठी

संवाद साधताना त्या म्हणाल्या, शिवशक्ती परिक्रमेच्या वेळी मी महालक्ष्मीच्या दर्शनाला आले होते. दरवर्षी दर्शनाला येत असते. प्रत्येक वेळी वेगळ्या भूमिका मिळत गेल्या, आता कॅबिनेट मंत्री म्हणून आले आहे. शेवटी महालक्ष्मीचा आशीर्वाद असल्याशिवाय कुठलेही कार्य सफल होत नाही. राज्याची मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे, मला जे खाते मिळाले आहे ते सृष्टीला वाचविण्यासाठीचे आहे, जगभरातून अनेक जण यात योगदान देतात तसं योगदान देण्याची संधी मला मिळाली आहे. मानव जातीला वाचवायचे असेल तर पर्यावरण वाचवलं पाहिजे.

**नद्यांना प्रदुषण मुक्त करणार**

कोल्हापूर येथे पूर्वी मोठा पूर आला होता,याची आठवण आ. महाडिकांशी चर्चा करताना आली.त्यामुळे पर्यावरणाच्या माध्यमातून या भागाला पूर मुक्त करण्यासाठी तसेच प्रदुषण मुक्त नद्यांचे डिपार्टमेंट माझ्याकडेच असल्याने पंचगंगा नदीचं काम हाती घेणार आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या.

---------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४



## अधिक्षक शासकीय निरीक्षणगृहात वीर बालदिन साजरा

बीड । प्रतिनिधी

जिल्हा अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे वीर बाल दिन साजरा करण्यात आला. सुधीरकुमार ढाकणे बाल विकास प्रकल्प अधिकारी,मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड ,अशोक तांगडे अध्यक्ष बाल कल्याण समिती ,संतोष वारे बाल कल्याण समिती,तत्वशिल कांबळे बाल कल्याण



समिती,बालिका सिंधीकुं मठे शिक्षिका,शेख कैफ,शेख रिजवान,टिनमेकर फिरदोस हे होते,कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुरु गोविंद सिंगजी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग या वीर बालकांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मन्सुरी यांनी गुरु गोविंद सिंग जी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांच्या हौतात्म्याचे स्मरण करण्यासाठी वीर बाल दिवस साजरा केला जातो हे भाषणातुन विद्यार्थ्यांना सांगितले. कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पंकजाताई मुंडेंच्या राजकारणातलं पर्यावरण, संधीचे सोने करणार

पाटोदा । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रीमंडळात पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्याकडे तडफदार महिला मंत्री म्हणुन पाहिल्या जाते. खाते कोणतं?त्यापेक्षा मिळालेल्या जबाबदारीला न्याय देण्याची क्षमता त्या नेतृत्वात निश्चित असल्याने पर्यावरणातले बदल पहायला मिळतील यात शंका नाही. ज्यांनी राजकारणात समतोल साधताना सकारात्मक भुमिका घेवुन बीड जिल्ह्यात २०१४ ते २०१९ सुवर्णकाळ गाजवला, राजकारण जसं सर्वांना सोबत घेवुन त्यांच्याकडून केल्या जाते, त्याचबरोबर जिल्ह्यात विकासाची महाचळवळ केल्याचे सर्वांनी पाहिले. स्वच्छ आणि पारदर्शीपणा हा त्यांच्या राजकिय भुमिकेचा बाणा असुन त्यांच्या माध्यमातुन पर्यावरणातील बदल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, घनकचरा व्यवस्थापनासोबतच पर्यावरण जतन अर्थात निसर्गाच्या सोबत काम करताना निश्चित त्यांच्यात असलेली क्षमता खात्याला न्याय मिळवुन दिल्याशिवाय रहाणार नाही. नदी, तलाव याचे संवर्धन त्यांच्याकडेच आहे अर्थात पालकत्वाची भुमिका काय असते? हे त्यांनी दाखवुन दिलेलेच आहे. त्यामुळे आतापर्यंत ज्या खात्याची ओळख सामान्य लोकांच्या पर्यंत मोठ्या प्रमाणावर जावुन पोहोचली नाही, त्या खात्याला सुवर्णकाळ आल्याशिवाय रहाणार नाही.

मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर भाजपा नेत्या पंकजाताई मुंडेंकडे पर्यावरण आणि पशु संवर्धन खात्याचा कार्यभार देण्यात आला. एक गोष्ट खरी आहे की, खाते कोणते मिळाले? यापेक्षा मिळालेल्या जबाबदारीचे सोनं करून दाखवण्याएवढी क्षमता नेतृत्वात निश्चितच म्हणावी लागेल. पदभार स्विकारल्याबरोबरच त्यांनी खात्या अंतर्गत येणार्या योजना, ध्येय धोरणं वसुंधरा अभियान असेल किंवा घनकचरा व्यवस्थापन असेल, हवा प्रदुषण यासारख्या विषयावर अभ्यास करून संबंधित अधिकार्यांची बैठक घेत काही महत्वाच्या सुचना केल्या. जागतिक पातळीवर पर्यावरण अत्यंत महत्वाचा विषय असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे विशेष लक्ष्य आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याही आवडीचा विषय म्हणावा लागेल. पंतप्रधानांनी स्वच्छतेच्या बाबतीत स्वत: पुढाकार देशात घेतल्यांच्या नंतर सामान्य लोकांच्यापर्यंत तसं पाहता संदेश बर्यापैकी गेला आणि सर्वांचेच लक्ष्य स्वच्छतेच्या दृष्टीने वेधल्या गेले. पशु संवर्धन हे खातं देखील त्यांच्याकडे आहे. अर्थात विभागा अंतर्गत येणार्या सर्व योजनेला गती त्यांच्याकडून मिळु शकते. वातावरणावर बोलायचं झालं तर सद्यस्थितीत राजकारण, क्रिकेट आणि निसर्ग अर्थात पाऊस या विषयाचा कुणीही अंदाज लावु शकत नाही किंवा भविष्य कुणी सांगु शकत नाही. राजकारणात कुठल्याही क्षणी काही पण होवु शकते. क्रिकेटमध्ये कोण कधी आऊट होईल? आणि कोण कधी किती धावा काढेल?याचाही अंदाज नाही. तसं निसर्गाच्या लहरीपणाचा देखील अंदाज आणि भविष्य कुणी सांगु शकत नाही. हुडहुड भरण्याएवढी थंडी असताना देखील मुसळधार पाऊस पडुन जावु शकतो. त्याला अवकाळी म्हणतात. तसंच काही आता सर्व क्षेत्रात अवकाळीसारखं होवुन बसलं. निसर्गातले बदल जागतिक पातळीवर तज्ञांचा अभ्यास वेगवेगळ्या पद्धतीने सुरू असला तरीही कुणी काहीच सांगु शकत नाही. कुठले वारे कोणत्या दिशेने कधी वाहतील? कळणार नाही. अर्थात राजकारणाच्या माध्यमातुन पहायचं झालं तर लोकसभेला महाविकास आघाडीला यश



मिळाल्यानंतर महाराष्ट्र बहुमताने ताब्यात येईल अशी राजकिय परिस्थिती निर्माण झाली. पण मात्र विरोधकांचं टमरेल वाजलं आणि महायुती बहुमतांनी सत्तेवर आली. त्यातच पंकजाताईसारखं महिला नेतृत्व कॅबीनेट मंत्रीपदावर विराजमान झालं. त्या नेतृत्वाला दुरदृष्टी आणि विकासाची खर्या अर्थाने भुक आहे. राजकारण करताना शेवटच्या माणसाच्या कल्याणासाठी त्यांच्या भुमिकेत नेहमीच वेगवेगळे बदल पहायला मिळतात. विकासात्मक गती देण्याची त्यांची हिंमत लोकांनी जवळुन पाहिली. मधल्या काळात पालकमंत्री असताना जिल्ह्यात विकासाची गंगाच त्यांनी खेचुन आणली. ग्रामविकास खात्याची ओळख जनतेला नव्हती. ती केवळ त्यांच्या माध्यमातुन अर्थात २५१५ लोकांना झाली. जलसंधारणाची कामे, महिला बचत गट आणि जिल्ह्याचे राजकारण करताना हवामान बदलाप्रमाणे स्वच्छ राजकिय संस्कृती पाच वर्षात बदल घडवुन आणला होता. विरोधकांनी देखील त्यांच्या कार्यकर्तृत्वाचं कौतुक केलं. सबका साथ, सबका विकास पंतप्रधान मोदीजींचा मंत्र आणि स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी दाखवलेला जनसेवेचा मार्ग न सोडता संधीच्या माध्यमातुन सामान्य लोकांची सेवा आणि उद्धार कसा करायचा? हे त्यांनी कामातुन दाखवुन दिलं. घाणेरडे राजकारण देखील त्यांना कधीच आवडलेले नाही. स्वत: कधीही कुणाचा द्वेष न करता स्वच्छ मनाने जनसेवा करणारे नेतृत्व म्हणुन त्यांची ओळख. सत्तापदावर असताना सुडाच्या भुमिकेतुन कधीच त्यांनी काम केले नाही. विकासाची चळवळ आणि सकारात्मक भुमिका हे खर्या अर्थाने त्यांचे राजकारण असुन सामान्य जनतेला त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा निश्चितच रहातात. राज्याच्या कानाकोपर्यातुन त्यांच्यावर गोरगरिब प्रेम का करतात? हा प्रश्न जेव्हा समोर येतो तेव्हा उत्तर आपोआप मिळतं की हा चेहरा म्हणजे सकारात्मक आणि अठरापगड जातीला सोबत घेवुन काम करणारा या धाग्यातुन त्यांच्याकडे पाहिल्या जाते. पालकमंत्री म्हणुन त्यांनी बीड जिल्ह्यात राजकिय समतोल राखताना वैचारिक पातळीवर जिल्ह्याची संस्कृतीच बदलुन टाकली होती. नेतृत्व म्हणुन समाजातील वंचित, उपेक्षित, अठरापगड जातीधर्माच्या लोकांना काहीतरी दिलं पाहिजे ही त्यांच्याकडे असलेली दुरदृष्टी जनकल्याणाचा धागा म्हणुनच सांगता येईल. सत्तापदापेक्षा समर्पित भावेतुन सेवाभाव त्यांच्या अंगी वृत्ती आहे. पदावर असताना आणि नसताना कुठलाही राजकिय बदल त्यांच्या स्वभावात कधीच खालीवर झालेला नाही. मध्यंतरी पाच वर्षे सत्तेच्या बाहेर असताना वैचारिक जडणघडण आणि तत्वाची निष्ठा यातही त्यांनी कधी चालढकल केली नाही. संघटनात्मक राष्ट्रीय पातळीवर त्यांना जबाबदारी मिळाल्यानंतर मध्यप्रदेशासह देशात ठिकठिकाणी त्यांनी संघटनेच्या कामासाठी दिलेले योगदान मोठे म्हणावे लागेल. ज्या नेतृत्वाला राजकिय समतोल आणि त्यातलं प्रदुषण रोखण्याची किमया येवु शकते त्यांच्याकडे मंत्रीमंडळात आलेले पर्यावरणासारखं खातं ज्याला गती मिळाल्याशिवाय रहाणार नाही. राजकारणात हवा जशी प्रदुषित त्याहुन अधिक बदलत्या वातावरणामुळे हवा देखील प्रदुषित ज्याचा जनतेच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होताना दिसतो. मुंबई, नागपुर, पुण्यासारख्या शहरात प्रदुषण हवेचे परिणाम जनतेला भोगावे लागतात. त्यात मोठ्या प्रमाणावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बदल करण्याची क्षमता त्यांच्यात निश्चित आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा नदी जोड प्रकल्प खर्या अर्थाने महत्वाकांक्षी म्हणुन ओळखल्या जातो. त्याचबरोबर नद्यांच्या माध्यमातुन पाणी वळवणे आणि दुष्काळी भागात पाणी देणे हे काम सरकारनं हाती घेतलं. या सार्या उपक्रमात पर्यावरणाची भुमिका महत्वाची रहाणार आणि नदी, तलाव, नाले संवर्धन खर्या अर्थाने या नेतृत्वाकडून होवु शकते हे तितकंच खरं. पशु संवर्धन तितकाच महत्वाचा विषय असुन ग्रामीण भागात यंत्रणा खर्या अर्थाने जावुन पोहोचते का नाही? यावरही लक्ष्य ठेवणे महत्वाचे ते काम आता परिपुर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. एकीकडे जनावरांची संख्या कमी होत असताना असाध्य रोगांचेही आवाहन फार मोठे त्यात सुधारणा करताना निश्चितच गाव पातळीवर पशु वैद्यकिय दवाखानेही सुरू करावा लागतील. सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की पंकजाताई मुंडेंना उल्लेख केल्याप्रमाणे सर्वस्थळी समतोल साधणे शक्य झाले तसं आता खात्याच्या माध्यमातुन पर्यावरणा अंतर्गत खुप काही करून दाखवतील हे नक्की.

## शनिवारी मोर्चामुळे पर्यायी मार्गाचा वापर करा-पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी संतोष देशमुख हत्या प्रकरणी तपासाच्या अनुषंगाने विविध मागण्यांसाठी सर्वपक्षीय, सर्व धर्मीय महा मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चाच्या अनुषंगाने वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून बीड शहरांमध्ये येणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी काढले आहेत.**



बीड शहरात सध्या वापरात असलेला

१)नगर नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बस स्थानक, लायन्स पेट्रोल पंप, महालक्ष्मी चौक या मार्गावरील वाहतूक उद्या दिनांक २८ डिसेंबर रोजी नगर नाका-राजीव गांधी चौक-अंबिका चौक-रिलायन्स पेट्रोल पंप-महालक्ष्मी चौक या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

२)छत्रपती संभाजी महाराज चौक-बार्शी नाका-छत्रपती शिवाजी महाराज चौक-बस स्थानक-महालक्ष्मी चौक या मार्गे जाणारी वाहने छत्रपती संभाजी महाराज चौक-बीड बायपास-महालक्ष्मी चौक या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

३)छत्रपती संभाजी महाराज चौक-बार्शी नाका-छत्रपती शिवाजी महाराज चौक-नगर नाका या मार्गावरील वाहतूक छत्रपती संभाजी महाराज चौक-बीड बायपास-महालक्ष्मी चौक-रिलायन्स पेट्रोल पंप-अंबिका चौक-राजीव गांधी चौक-नगर नाका या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. ४) परळी-बार्शी नाका-छत्रपती शिवाजी महाराज चौक- नगर नाका- महालक्ष्मी चौक या मार्गावरील सर्व वाहतूक परळी-बार्शी नाका-बीड बायपास-महालक्ष्मी चौक-रिलायन्स पेट्रोल पंप-अंबिका चौक-राजीव गांधी चौक-नगर नाका या मार्गे वळविण्यात येणार आहे. वरील मार्गावरील सर्व वाहतूक (मोर्चासाठी जाणारी वाहने, बंदोबस्तातील वाहने, रुग्णवाहिका, अग्निशामक दलाची वाहने वगळून ) दिनांक २८ डिसेंबर रोजी सकाळी आठ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सर्व प्रकारची वाहतूक वरील मार्गाने मिळविण्यात येणार आहे. सर्व वाहन चालक-मालक यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे.

## महाकालेश्वर मंदिर रस्ता मार्गी लावणार -आ.अर्जुनराव खोतकर

जालना । प्रतिनिधी

हनुमान घाट कट्टा परिसरातील श्री पलसिध्द सेवाश्रमात भगवान महाकालेश्वर व जगद्गुरु पलसिध्द महास्वामीजींच्या दर्शनासाठी येण्याकरता भाविकांच्या मागणीनुसार आपण रस्त्याच्या कामास प्रारंभ केला मात्र तांत्रिक अडचणी उद्भवल्या तरीही योग्य तो मार्ग काढून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे वचन आ. अर्जुनराव खोतकर यांनी आज दिले.

हनुमान घाट कट्टा परिसरातील श्री पलसिध्द सेवाश्रमात भगवान महाकालेश्वर व जगद्गुरु पलसिध्द महास्वामीजींच्या मूर्तीची गुरुवारी ( ता.२६) ष. ब्र. १०८ वेदान्ताचार्य शिवाचार्य रत्न सिध्दलिंग शिवाचार्य यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तसेच शिवमहापूराण कथेची सांगता



झाली. आ. खोतकर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज, प्रेममूर्ती जगदीशानंद शास्त्री, आदींची या प्रसंगी उपस्थिती होती.

आ.अर्जुनराव खोतकर यावेळी बोलतांना म्हणाले की,पशुपालन ,दुग्ध व्यवसाय करणारा लिंगायत गवळी समाज प्रामाणिकपणे काबाडकष्ट करून जगतो या समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असून शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजेत असे नमूद करत लिंगायत गवळी समाजाच्या सामाजिक सभागृह आणि मंगल कार्यालयासाठी प्रसंगी एक कोटीचा निधी देणार असल्याची घोषणा आ.अर्जुनराव खोतकर यांनी करताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

## माजलगावमध्ये ख्रिसमस नाताळ मोठ्या उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील नवीन भाटवडगाव वस्तीमध्ये त्रिनिटी फेलोशीप चर्च ख्रिस्त नगरी नवीन भाटवडगाव या ठिकाणी ख्रिसमस नाताळ सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला हाजारोच्या संख्येने भाविक उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ख्रिसमस नाताळ निमित्त वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते या कार्यक्रमासाठी अहील्यानगर वरुन पा.रंजना पवार या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या त्यांनी ख्रिसमस नाताळ काय आहे याचे चांगल्याप्रकारे स्पष्टीकरण करुन मार्गदर्शन केले. आज सर्व जगात ख्रिसमस नाताळ मोठ्या उत्साहात साजरा केला जातो ख्रिसमस नाताळ चा संदेश हा सर्व मानव जातीसाठी एक उपहार आहे कारण ख्रिसमस नाताळचा अर्थ हा आहे की प्रभु येशु ख्रिस्त या जगात आला त्याने संपुर्ण मानवासाठी पाप क्षमेचा उपहार दिला प्रभु येशु ख्रिस्ताचा या जगात येण्याचा




विशेष अर्थ हा आहे की सर्व मानव जातीचे तारण व्हावे म्हणून येशु ख्रिस्त या जगात आला त्याने अखिल मानव जातीसाठी स्वताचा प्राण दिला आणि तो पुन्हा तिसऱ्या दिवशी मरणातुन जिवंत झाला आणि आज देखील तो जिवंत आहे बायबल मध्ये लूक २:१० मध्ये आसे लिहिले आहे की आज दाविदाच्या गावात तारणारा जन्माला आला आहे तो ख्रिस्त प्रभु आहे त्यांनी बायबल मधुन वेगवेगळ्या वचनामधुन येशु हाच तारणारा प्रभु आहे हे दाखवून दिले येश ख्रिस्त हा कोणत्याही एका जातीचा किंवा एका धर्माचा देव नाही तो सर्व विश्वाचा प्रभु आहे असे त्यांनी सांगितले या कार्यक्रमाला हाजारो च्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता तसेच माजलगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि पत्रकार परमेश्वर सोळंके,बाळासाहेब अडागळे,ऑड संतोष कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती आणि वेगवेगळ्या स्तरातुन नागरिकांनी आपली हाजरी लावली होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्रिनिटी फेलोशीप चर्च कमिटीचे सदस्य प्रवीण आडागळे,राम गायकवाड,प्रेम साबळे,महावीर फुलवरे,रुषीकेश समर्थ,रणजित, विश्वजीत,आदित्य, सार्थक डोंगरे, जाधव,हारी,गोविंद, बाबु,आशोक,राम, विजय,जगन्नाथ व बंडु या सर्वांनी मेहनत घेतली.

## सरगम म्युझिकल ग्रुपने कोल्हापूरचे नाव सातासमुद्रापार नेले - महाराष्ट्र आयएमएचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड तर्फे आयोजित विश्वविक्रमी संगीत सोहळ्यात महाराष्ट्रातून ९० गायक कलाकारांनी मदनमोहन यांनी संगीतबद्ध केलेली १०० गीते गात संगीतकार मदन मोहन यांना त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त संगितांजली अर्पण करीत सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये याची विश्वविक्रमी नोंद केली.**



या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून सिफाचे एडिटर इन चीफ प्रा.डॉ.दीपक राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबेजोगाईचे सुप्रसिध्द मानसोपार तज्ज्ञ तथा शिक्षण सभापती व महाराष्ट्र राज्य आयएमएचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची विक्रममंचावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते मदन मोहन यांच्या प्रतिमापूजनाने झाले. यावेळी बोलतांना सिफाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.दीपक रावत यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करीत या अनोख्या विश्वविक्रमाचा मला साक्षीदार होता आल याचा गर्व वाटतो आणि महाराष्ट्रात असा विश्वविक्रम झाला ही तमाम महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे असे सांगत हा विक्रम दीर्घकाळ अबाधित राहील असे प्रतिपादन केले. डॉ.राजेश इंगोले यांनी कोल्हापूर हे पूर्वी मराठी चित्रपट सृष्टीचा आत्मा होता, जगदीश खेबुडकर आणि अशा अनेक महान विभूती येथे जन्माला आल्या ज्यांनी आपल्या अलौकिक कार्याद्वारे चित्रपट सृष्टीत अनेक विक्रमाची शिखर गाठली आणी हाच गौरवशाली परंपरेचा विक्रमी वारसा सरगम ग्रुपच्या डॉ.आशा शितोळे, डॉ.राजेंद्र तामगावकर समर्थ पणे पुढे चालवीत हा विक्रम केला असल्याबद्दल त्यांचं कौतुक करीत या संगीत ग्रुपने कोल्हापूरचे नांव सातासमुद्रापार नेत विश्वविक्रमी पुस्तकात कोरले ही तमाम कोल्हापूरकरच नव्हे तर महाराष्ट्र आणि देशासाठी गौरवाची गोष्ट असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी माझ्यासह अनेक कलाकार इतक्या दुरवरून कोल्हापूरला आले आहेत. याचे कारण केवळ संगीतावरील असलेले सर्वांचे प्रेम असल्याचे सांगत कोल्हापूर, सरगम ग्रुप आणि आम्ही सर्व कलाकार संगीत नावाच्या जादुई दुव्याने जोडले गेले असल्याने ही रेशीमगाठ आणी ऋणानुबंध कधीच सुटणार नाहीत अशी ग्वाही दिली. संगीत हे माणसांची मने जोडण्याचे काम करतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा कार्यक्रम आहे असे गौरवोद्गार ही डॉ.राजेश इंगोले यांनी काढले. याप्रसंगी या संगीतमंचावर कार्यक्रमाच्या प्रमुख संयोजिका डॉ.आशा शितोळे, राजेंद्र तामगावकर यांचीही विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सिफा बुक ऑफ रेकॉर्ड (सोसायटी ऑफ इंटिग्रेटेड फेडरेशन ऑफ अवॉर्ड) यामध्ये नोंद करून या सांगीतिक सुमनांजलीची जागतिक विश्वविक्रम म्हणून नोंद घेण्यात आली. सरगम म्युझिकल ग्रुप (एसए) यांच्या वतीने संगीतकार मदन मोहन यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांचा हा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमात राज्यभरातील सुप्रसिध्द गायक कलाकार सहभागी झाले होते. हा विश्वविक्रमी कार्यक्रम सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा असा तब्बल नऊ तास चालला यात नव्वद गायकांनी मदनमोहन यांची शंभर गाणी गात अनोखा विश्वविक्रम केला. यावेळी गायक कलाकारांना सीफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी यशवंत बँकेचे संचालक बाबुराव रानगे, डॉ.आशा शितोळे, डॉ राजेंद्र तामगावकर, डॉ.अनिल कवठेकर, दिगंबर सूर्यवंशी, माया मनपाडळेकर, अनिता गवळी, के.टी.शिंदे, उत्तम पाटील, पुष्पक गवई, राजकुमार पारकर उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सरगम म्युझिकल ग्रुपचे सुभाष भाट यांच्या मार्गदर्शनात सर्व सभासद सदस्य आणि पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला.

## सोळंके साखर कारखाना कर्मचाऱ्यांकडुन स्व.देशमुख यांच्या कुटुंबीयांना ५.५६ लाखाची मदत

माजलगाव । प्रतिनिधी

मस्साजोग ता.केज येथील लोकप्रिय सरपंच संतोष देशमुख यांची दिनांक ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली त्यांचे कुटूंबियाना आर्थीक मदत म्हणुन लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना कर्मचारी यांचे वतीने एक दिवसाचे वेतनाची रक्कम रु.५.५६ लाख निधीचा धनादेश स्व.संतोष देशमुख मदत निधीसाठी आ. प्रकाश सोळंके यांचेकडे दिनांक २६ डिसेंबर गुरुवार रोजी कारखाना कार्यालयात सुपूर्द करण्यात आला.

स्व. संतोष देशमुख यांची आर्थीक परिस्थीती बिकट असल्याने माजलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा कारखान्याचे मार्गदर्शक आ. प्रकाश सोळंके यांनी या मदत निधीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते.या आवाहनास प्रतिसाद म्हणुन कारखाना कर्मचारी यांनी एक दिवसाचे वेतन रुपये ५.लाख ५६ हाजार मदत निधीसाठी देण्याचा निर्णय घेतला. यावेळी कारखान्याचे मार्गदर्शक धैर्यशील सोळंके,कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर,सचिव सुरेश लगड, युनीयनचे अध्यक्ष गणेशराव सोळंके, उपाध्यक्ष. दत्तात्रय सोळंके आदींची उपस्थीती होती.

## पान ६ वरून...

### बीड जिल्ह्यातील लोक

अगदी खेडूत असो, आपण त्याला उल्लू बनविणे अशक्य आहे. ईथल्या लोकांना व्यवहार ज्ञान कमालीचे आहे. त्यामुळे प्रत्येक ची यथायोग्य चिरफाड करून त्या चौकटीत आपले काम बसविण्याची कला आणि निपुणता इथल्या लोकांमध्ये आणि राजकारण्यांमध्ये पहायला मिळते. उत्सवप्रिय लोक आहेत. बीड मधील अनेक रंजक किस्से देखील आहेत.ज्यातून तिथल्या लोकांच्या वैचारिक आणि बुद्धिमत्ता विषयक बाबींचा उलगडा होतो. अफलातून आहेत लोकं. सामाजिक राजकीय आर्थिक आणि वैयक्तिक पातळीवर जर गांभीर्याने विचार केला, तर बऱ्याच गोष्टींचा उलगडा होईल. गुन्हेगारीचे समर्थन अजिबात कुणी करू नये.आणि ते कधीच कुणीही सभ्य व्यक्ती मान्य करणार ही नाही.परंतु बीड हा एक अनोखा जिल्हा आहे. लोक प्रेमळ आहेत, मनमोकळे आहेत. मुख्य म्हणजे अत्यंत हुशार आहेत, क्रियाशील आहेत. उत्पन्नाची साधने अत्यंत तोकडी, त्यामुळे शासकीय योजनांद्वारे लाभ घेण्यासाठी धडपड असते, प्रसंगी काही गैरप्रकार होतात.पण ते चोहीकडे बघायला मिळतात. शेतीमध्ये नवनवे प्रयोग करून विक्रमी उत्पादन घेतलेली अनेक शेतकरी आहेत. कष्टकऱ्यांचा जिल्हा आहे. उसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख लाभलेला बीड. जरा जाणून घ्यावेत त्यांचे प्रश्न आणि त्यांचे खडतर आयुष्य. पर्जन्यमान कमी आणि कुठेच विकसित नाही.उद्योगधंदे नाहीत.त्यामुळे बेकारीचे प्रमाण अधिक. तरुण पिढी अधिक राजकारणाकडे ओढली गेली आणि त्यातून हुल्लडबाजी आणि गुन्हेगारी बघायला मिळते. पण सर्वसामान्य माणूस खूप वेगळा आहे. कुटुंबवत्सल आहे.प्रेमळ आहे.जाणीव ठेवणारा आहे. आजवरच्या शासकीय नोकरीच्या काळात आठवण ठेवणारे, ओळख ठेवणारे आणि कुठेही मी दिसलो तर धावत येवून स्वतःची ओळख सांगून भेट घेणारे लोक मी फक्त बीड जिल्ह्याचे असलेले पाहिले आहेत. अधिकाऱ्यांचे कौतुक असते त्यांना.हक्काने भांडतात.पण मनात आकस न ठेवणारे लोक आहेत. राजकारण लोकांच्या नसानसात भिनले आहे. वेळेचे भान पाळणारे लोक आहेत. आपण अगदी सहजपणे बोलून जातो, की तुम्ही दोन दिवसांनी या.आणि कामाच्या ओघात आपण विसरून जातो.पण ती व्यक्ती बरोब्बर दोन दिवसांनी येते आणि बोलते.साहेब, तुम्ही मला दोन दिवसांनी बोलावले होते, झाले का माझे काम ? सिग्नल वर थांबून शिस्तीत चालणारी ट्रॅफिक बघायला निश्चित छान वाटते.पण बीड मधील ट्रॅफिक ही सिग्नल न जुमानता चालेल पण एकमेकांना अजिबात त्रास नाही होवू देणार.अशावेळी सिग्नल ची गरज काय सारी वाहतूक तर सुरळीत सुरू आहे ?असा प्रश्न विचारतील. त्यामुळे अफलातून जिल्हा आणि प्रेमळ लोक अशी बीडची ओळख आहे. इथले लोक आणि त्यांचा चांगुलपणा ही विचारात घेतला पाहिजे.

### अंबाजोगाई ग्रामीण पोलीस

ग्रामीण पोलिसांनी आज पर्यंत या बनावट दारूच्या कारखान्यावर कार्यवाही का केली नाही? हा प्रश्न असून हा कारखाना चालवणाऱ्या मंडळीने ग्रामीण पोलीस व अधिकारी यांचे हात ओले केले आहेत की बांधले आहेत हे काही समजायला तयार नाही. विशेष म्हणजे अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मध्ये सुरू असलेल्या अवैध धंदे वाल्याना येथील उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले आणि अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम यांचे ही अभय आहे की काय कोण जाने कारण हे अधिकारीही कधीच या परिसरात कार्यवाही करताना दिसत नाहीत.

### चक्क पोलीस चौकी समोरच

फिर्यादीनुसार, बुधवारी (दि.२५) रात्री ९.३० वाजताच्या सुमारास श्रीहरी दौलत मुंडे (रा. क्रांती नगर, अंबाजोगाई) हा जमीरला दारू पिण्यासाठी आग्रह करत होता. यावेळी जमीरने त्यास नकार देऊन शिवीगाळ केली. त्यानंतर रात्री १२.३० वाजता जमीर स्वाराती रूग्णालयासमोरील चौकात बसला असताना श्रीहरी मुंडे याने त्यास पोलीस चौकीजवळील एटीएम समोर बोलावले. जमीर तिथे जाताच श्रीहरीने शिवीगाळ का केली होतीस असा जाब विचारत जमीरच्या मानेवर चाकूने वार केला तर आर्यन मांदळे व अनोळखी दोघांनी कोयता आणि चाकूने जमीरवर प्राणघातक हल्ला केला असे फिर्यादीत नमूद आहे. सदर फिर्यादीवरून श्रीहरी मुंडे, आर्यन मांदळे व अनोळखी दोघांवर अंबाजोगा शहर ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या जमीरवर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. ऐन पोलीस चौकीसमोर झालेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

### दिंद्रुडच्या सहाय्यक पोलिस

जप्त केलेल्या दोन चाकी व चार चाकी वाहने व्यवस्थित लावण्यात आली. ठाणे परिसर स्वच्छ व डास मुक्त व्हावा या उद्देशाने ही मोहीम राबवण्यात आल्याचे सपोनि अण्णाराव खोडेवाड यांनी माध्यमांना सांगितले. पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून दिंद्रुड ठाणे परिसराची स्वच्छता मोहीम राबवतात. यामुळे दिंद्रुड पोलीस स्टेशन चा परिसर स्वच्छ व सुंदर राहतो असे खोडेवाड यांनी याप्रसंगी सांगितले.

### सरपंच देशमुख हत्या प्रकरणामुळे

अध्यक्ष उमेश मोगरेकर, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी, तुकाराम येवले, दिनकर शिंदे, कमलेश जाब्रस, दत्ता येवले, महेंद्र मस्के, राज गायकवाड यांचेसह पत्रकार उपस्थित होते. माजलगाव तालुका पत्रकार संघ हा कायम सामाजिक दायित्व निभावत आला असुन माजलगाव धरणामध्ये डॉ. फपाळ यांचा पोहतांना मृत्यु झाल्यानंतर त्यांचा मृतदेह शोधण्यासाठी कोल्हापुर येथील आलेल्या बचाव पथकातील जवान राजशेखर मोरे यांचा दर्दैवी मृत्यु झाला होता. माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या पुढाकारातुन तालुक्यातील विवीध संघटना व दानशुरांनी तब्बल ५६ लक्ष रूपयांची आर्थिक मदत मोरे कुटूंबीयांना कोल्हापुर येथे जावुन देण्यात आली होती तर मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना देखील एक हात मदतीचा असावा म्हणुन आ. प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातुन पत्रकार संघाने आर्थिक मदत एकत्रीत केली असुन ४ जानेवारीला ही मदत देण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांचे सोयाबीन विना

आहेत . परंतु संबंधितांकडून शेतकऱ्यांना केंद्रावर विक्रीसाठी सोयाबीन आणू नये असे सांगितले जाते . त्यामुळे धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन खाजगी व्यापार व्यापाराकडे विक्री करण्याची वेळ येत असून , व्यापाऱ्याकडून सोयाबीनची कमी भावाने खरेदी केली जात आहे . त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत असून शासनाने शेतकऱ्याची सोयाबीन खरेदी करण्याचे आदेश असूनही शेतकऱ्यांना धारूर तालुक्यातील अधिकाऱ्याच्या मनमनी मुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे यासाठी खरेदी विक्री संघ कार्यालयासमोर अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने किसान सभेचे तालुका अध्यक्ष कॉ ॲड संजय चोले जिल्हा कार्याध्यक्ष कॉ काशीराम शिरसट तालुका सचिव कॉ दादासाहेब शिरसट कॉ मधुकर चव्हाण , बंडू शिरसट , गीताराम शिरसट , अंकुश घुगे , महादेव डापकर , गणेश शिरसट कॉ मेघराज तिडके सीटू संघटनेचे जिल्हा सचिव कॉ डॉ अशोक थोरात हे बेमुध्द धरणे आंदोलनासाठी बसले आहेत . तसेच दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी खरेदी विक्री संघातील प्रशासक श्री कातथळे यांच्या बरोबर बैठकीचे आयोजन केले आहे. असे दिलेले प्रशिद्धी पत्रकत किसान सभेचे तालुका सचिव कॉ दादासाहेब सिरसट माहिती दिली.

### मूक मोर्चाला मोठ्या

तपासात कसलीही प्रगती नाही. आरोपी अटक केले गेले नाहीत. संपूर्ण जिल्हा आरोपींचे कॉल रेकॉर्डस तपासण्याची मागणी करत असताना तेही करण्यात आले नाही. देशमुख कुटुंब उघड्यावर पडले आहे. एक आदर्श असा सरपंच गावाने गमावला. बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांशी थैमान घातले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची पायमल्ली होत आहे. जो प्रकार स्वं.संतोष देशमुख यांच्यासोबत झाला तो आणखी कोणासोबत होणार नाही, यासाठी दि.२८ डिसेंबर रोजी होणार्या भव्य मूक मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सय्यद सलीम यांनी केले आहे.

cmyk

# ॲग्रीस्टॅक योजनेद्वारे गाव नोंदणी अभियान सुरु

## प्रत्येक शेतकऱ्याला मिळणार युनिक फार्मर आयडी

नागपूर : देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी (क्रमांक) आहे... त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा एक ''युनिक फार्मर आयडी'' तयार केलं जाणार आहे.. केंद्र सरकारच्या महत्त्वकांक्षी ''ॲग्रीस्टॅक'' योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या लँड रेकॉर्डला जोडण्याची ( लिंक करण्याची ) मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.. सध्या त्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू असून लवकरच राज्यात गाव पातळीवर विशेष कॅम्प आयोजित करून एक कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे युनिक फार्मर आयडी तयार केले जाणार आहे. विशेष बाब म्हणजे भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच ''युनिक फार्मर आयडी'' च्या माध्यमातून मिळणार आहे.. तसेच जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यासाठी ही भविष्यात हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसात महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी युनिक फार्मर आयडी तयार करून घेणे महत्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या ''ॲग्रीस्टॅक'' योजने संदर्भात नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी माहिती दिली आहे.ॲग्रीस्टॅक'' योजनेअंतर्गत तयार होणारे ''युनिक फार्मर आयडी'' भविष्यात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. पीएम किसान सन्मान योजनेचे अनुदान मिळविणे, किसान क्रेडिट कार्ड बनविणे, पीक विमा काढणे, त्या अंतर्गत परतावा मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल. शिवाय सरकारने जाहीर केलेली पिकांची नुकसान भरपाई मिळविणे, पीक व शेती विषयक सर्वेक्षण करून घेणे, शेतमालाची एमएसपीच्या दराने विक्री करणे. कृषी विभागाच्या विविध योजना अंतर्गत कृषी निविष्ठा व इतर सेवांचा लाभ मिळविणे.




बाजारपेठेची माहिती, कृषी विषयक कामासंदर्भात कृषी तज्ञांचे मार्गदर्शन मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे. शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल. एवढंच नाही तर सरकारलाही या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून कोणत्या शेतकऱ्याची कुठे किती जमीन आहे. कोणता शेतकरी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेत आहे हे सर्व एका क्लिकवर माहीत होणार आहे. या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून सरकारला चालू हंगामात राज्यातील किती शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतले आहे, याची माहिती एका क्लिक वर मिळेल. त्यामुळे कृषी विभागाला विशिष्ट पिकाच्या शेतकऱ्यांना विशिष्ट मार्गदर्शन फोन द्वारे करता येणार आहे.जिओ रेफरन्सिगचे माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीचे डिजिटल नकाशे उपलब्ध होतील. या योजनेसंदर्भात महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांनी येऊन नोंदणी साठी आधार क्रमांक मागितल्यास सहकार्य करावे अशी सरकारची अपेक्षा आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६१ : पहिल्यांदा कोलकत्ता येथे चहा ची सार्वजनिक बोली पार पडली.
१९११ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कोलकाता येथील अधिवेशनात 'जन गण मन' हे रविंद्रनाथ टागोर यांनी रचलेले व संगीतबद्ध केलेले गीत प्रथमच म्हणण्यात आले. नंतर २४ जानेवारी १९५० रोजी या गीताला हे भारताचे राष्ट्रगीत म्हणून मान्यता मिळाली.
१९१८ : बृहद पोलंडमध्ये पोलिश लोकांचे जर्मन सत्तेविरूद्ध बंड पुकारले गेले.
१९३४ : पर्शिया च्या शाह ने पर्शिया चे नाव बदलवून इरान ठेवण्याची घोषणा केली.
१९४५ : २९ देशांनी केलेल्या करारानुसार जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांची स्थापना करण्यात आली.
१९४९ : इंडोनेशियाला (हॉलंडकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६६ : जगातील सर्वात लांब गुफा चा शोध लागला.
१९६८ : चंद्राची परिक्रमा करणारे अपोलो-८ स्पेस एअर क्राफ्ट समुद्रात उतरविले.
१९७२ : उत्तर कोरिया मध्ये नवीनसंविधानमंजूर झाले.
१९७५ : बिहारमधील (हल्लीचे झारखंड) चासनाला येथे कोळशाच्या खाणीत अचानक पाणी शिरून झालेल्या दुर्घटनेत ३७२ कामगार काही मिनिटांत ठार झाले.
१९७८ : ४० वर्षाच्या हुकुमशाहीनंतर स्पेन प्रजासत्ताक बनले.
२००४ : मॅग्नेटर एसजीआर १८०६-२० ला स्फोट झाल्यामुळे उत्सर्जित किरण पृथ्वीला पोहोचते.
२००८ : व्ही शांताराम पुरस्कार समारोहा मध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून तारे ज़मीं पर ला पुरस्कार मिळाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५७१ : योहान केपलर - जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: १५ नोव्हेंबर १६३०)
१६५४ : जेकब बर्नोली - स्विस गणितज्ञ (मृत्यू: १६ ऑगस्ट १७०५)
१७७३ : इंग्लंडचे शास्त्रज्ञ, शोधक आणि राजकारणी जॉर्ज केली यांचा जन्म.
१७९७ : मिर्झा गालिब - उर्दू शायर (मृत्यू: १५ फेब्रुवारी १८६९)
१८२२ : लुई पाश्चर - फ्रेन्च सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ सप्टेंबर १८९५)
१८९८ : डॉ. पंजाबराव देशमुख - स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री, विदर्भात त्यांनी केलेले शिक्षणप्रसाराचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांच्या तोडीचे मानले जाते. (मृत्यू: १० एप्रिल १९६५)
१९२७ : उत्तराखंडचे पहिले मुख्यमंत्री नित्यानंद स्वामी यांचा जन्म. (मृत्यू: १२ डिसेंबर २०१२)
१९३७ : लोकसभेचे माजी सदस्य शंकर दयाल सिंह यांचा जन्म.
१९६५ : हिंदी चित्रपट अभिनेता सलमान खान यांचा जन्म.
१९४२ : परमवीर चक्र विजेता आणि देशाचे सैनिक अल्बर्ट एक्का यांचा जन्म.
१९४४ : विजय अरोरा - हिन्दी चित्रपट आणि टीव्ही अभिनेता (मृत्यू: २ फेब्रुवारी २००७)
१९८६ : दोन वेळा वर्ल्ड आणि ऑलिम्पिक चॅम्पियन बनणारी जमैका ची धावपटू शैली एन फ्रेजर प्राईस यांचा जन्मफ

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०० : ब्रिटीश स्थापत्यशास्त्री विल्यम जॉर्ज आर्मस्ट्राँग यांचे निधन.
१९२३ : गुस्ताव्ह आयफेल - फ्रेंच वास्तुरचनाकार आणि अभियंता (जन्म: १५ डिसेंबर १८३२)
१९४९ : भालकर भोपटकर यांचे निधन.
१९६५ : मराठी साहित्यिक, ज्ञानोदयचे संपादक देवदत्त नारायण टिळक यांचे निधन.
१९७२ : लेस्टर बी. पिअर्सन - कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २३ एप्रिल १८९७)
१९९७ : मराठी भावगीत गायिका मालती पांडे-बर्वे यांचे निधन.
२००२ : आसामी लोकगीत गायिका प्रतिमा बरुआ-पांडे यांचे निधन.
२००३ : ला भारतीय कवी के एस एस नरसिंहस्वामी यांचे निधन.
२००७ : पाकिस्तानच्या पंतप्रधान बेनझीर भूट्टो यांची हत्या (जन्म: २१ जून १९५३)
२०१३ : अभिनेता फारुख शेख यांचे निधन.

# हिवाळ्यात अश्या प्रकारे घ्या जनावरांची काळजी



सध्या राज्यात थंडी पडत चालली आहे. थंडीत आपल्या गुरांच्या आरोग्याची सुद्धा काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच वाढती थंडी जनावरांच्या आरोग्यासाठी खूप हानिकारक ठरत असते. थंडीचा सर्वात मोठा परिणाम हा दुधाळ गुरांवर होत आहे. या ऋतुत जनावरांची पचनशक्ती मंदावते म्हणून उर्जायुक्त आहार जनावरांना देणे गरजेचे असते.

हिवाळ्यात थंडीमुळे जनावरांना फुफ्फुसाचे आणि श्वसनाचे विकार होतात. त्यामुळे जनावरांच्या आहारात कॅल्शियमचे प्रमाण वाढवावे. गोठ्यामध्ये उबदारपणा राहण्यासाठी गोठ्याच्या जाळीला पोते बांधावे. सकाळच्या कोवळ्या उन्हामध्ये जनावरांना बांधावे. जनावरांना पुरेसे स्वच्छ पाणी पाजावे. जनावरांकडे लक्ष ठेवूनही त्यांचा माज लक्षात न आल्यास अशा गाई, म्हशींची पशू वैद्यकाकडून आरोग्य तपासणी करावी. हिवाळ्यात जनावरांना थंडीपासून बचाव करण्यासाठी जनावरांना जास्तीचा खुराक द्यावा. याशिवाय योग्य प्रमाणात हिरवा चारा द्यावा. आणि वासरांना हिवाळ्यात उबदार ठिकाणी ठेवावे. हिवाळ्यामध्ये गोचिड, पिसवा, खरजेचे किडे यांसारख्या बाह्य परजीवींचा जास्त प्रादुर्भाव होतो. हे बाह्य परजीवी जनावरांचे रक्त शोषतात. यामुळे रक्ताची कमतरता होवून जनावरे अशक्त होतात. बाह्य परजीवींपासून बचाव करण्यासाठी जनावरांना खरारा करावा. यामुळे शरीरावरील बाह्य परजीवी गळून पडतात. गोठ्याच्या फटीत हे परजीवी लपून बसतात त्यामुळे गोठ्याच्या कानाकोपऱ्यामध्ये लपलेले असतात त्यामुळे गोठ्यात गोचिडनाशकांची फवारणी करावी. हिवाळ्यात पशू वैद्यकाकडून योग्य सल्ला घेवून जनावरांना लसी द्याव्यात.

# दुभत्या जनावरांची काळजी घेतल्यास उत्पादनात वाढ

थंड वातावरणामुळे जनावरांच्या नाक व डोळ्यांतून पाणी येणे, भूक कमी होते. जनावरे कापतात. हे लक्षात घेऊन संध्याकाळ होताच जनावरांना गोठ्याच्या आत बांधावे. थंड वारा लागणार नाही याची काळजी घ्यावी. त्यांना बैठकीच्या ठिकाणी कोरडा चारा किंवा पेंडा पसरावा. जास्त थंडी असल्यास, गोठ्यामध्ये सावधानता बाळगून शेकोटी करावी. शेकोटी केल्यास धूर व्यवस्थित बाहेर जाईल याची दक्षता घ्यावी.

थंड वातावरणात शरीराचे योग्य तापमान राखण्यासाठी ऊर्जा गरजेची आहे. जास्त थंड वातावरणात जनावरांच्या शरीराची ऊर्जेची गरज वाढते, त्यामुळे जनावरांचे शरीर काही वेळा थंडीने थरथरताना दिसते. थंड वातावरणात असणारी ऊर्जेची कमतरता लगेच भरून येत नाही, त्यामुळे खाद्यातील कुठलेही बदल हे अतिशय हळू करावे लागतात. ऊर्जायुक्त खाद्य घटक जनावरांना दुपार नंतर किंवा संध्याकाळच्या वेळी द्यावेत. जेणेकरून त्यांना पचवून निर्माण होणारी ऊर्जा रात्रीच्या वेळेस उपयोगी येऊ शकेल. त्यामुळे तापमान कमी होण्याआधी आंबवण किंवा पशुखाद्याव्यतिरिक्त ऊर्जायुक्त घटक जसे मका एक किलो, बायपास फॅट १०० ग्रॅम हे पशुखाद्यासोबत द्यावेत.



गोठा व्यवस्थापन

वारा, थंडीपासून संरक्षण करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गायी, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण ठेवावे. गोठा हवेशीर असावा. पुरेसा नैसर्गिक प्रकाश आणि ऊन हे आजाराचा प्रसार रोखण्यासाठी मदत करते. गोठ्याचा भूभाग निसरडा नसावा आणि स्वच्छ करण्यास सोपा असावा. रात्रीच्या वेळी शेडनेट किंवा बारदानाने गोठा बंद करावा जेणेकरून गार वारे रोखण्यास मदत होईल. रात्री गोठ्यातील बल्ब चालू ठेवावा. जेणेकरून तापमान नियंत्रित ठेवता येते. बैठकीची जागा जितकी कोरडी तितकी जमीन उबदार राहते. थंडीपासून जनावरांचे संरक्षण होते.

आहार आणि पाणी नियोजन

शरीराचे तापमान राखण्यासाठी गायींना जास्त ऊर्जा लागते. आहारात चांगल्या दर्जाचे गवत, कडबा किंवा मुरघासाचा वापर करावा. हिवाळ्यात जास्त प्रथिनयुक्त आहार दिला गेल्यास उच्च दर्जाच्या प्रथिनांचा अधिक वापराने ॲसिडोसिस होण्याची शक्यता असते. कोरडा चारा जितका जास्त तितकी शरीरातील ऊर्जा जास्त असते. हिवाळ्यात थंडीमुळे गाई, म्हशींना तहान कमी लागते. कमी पाणी पिल्यामुळे दूध उत्पादनावर परिणाम होतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. म्हणून नेहमी स्वच्छ पाणी उपलब्ध असल्याची खात्री करावी. हिवाळ्यामध्ये युरोपातील देशांत गायींना कोमट पाणी पिण्यास दिले जाते, याचा पाणी पिण्यावर व दूध उत्पादनात अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

आरोग्य व्यवस्थापन

हिवाळ्यात जनावरांचे जंत निर्मूलन करावे. जिवाणू व विषाणू नाशकाने गोठ्यामध्ये फवारणी करावी. जखमा होऊ नयेत व झाल्यास लवकर बऱ्या होण्यासाठी खाद्यामध्ये चिलेटेड जस्त (झिंक) आणि बायोटीनयुक्त खनिज मिश्रणाचा समावेश करावा. ग्लिसरीन, प्रोविडॉन आयोडीन आणि पाणी यांचे समप्रमाणात मिश्रण करून त्यात दूध काढल्यानंतर सड बुडवावेत. दूध काढण्याअगोदर थंड पाण्याऐवजी कोमट पाण्याने कास धुवावी. वासरांना पाजणाऱ्या दुधाचे तापमान ३७ ते ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान असावे. वासरांना थंड दूध पिण्यासाठी देऊ नये. रात्रीच्या वेळी वासरांना बंदिस्त जागेत ठेवावे.

ओल्याव्यामुळे खुरांचा दोन नख्यांमधील जागेत जखम होते. त्याचा विपरीत परिणाम दूध उत्पादनावर होतो. त्यामुळे खुरांकडे लक्ष द्यावे.

# पोल्ट्री उद्योगामधून तयार होतेय नवीन ओळख

पुणे शहरातील ग्राहकांची गरज ओळखून चिकनसोबत अंड्याची वाढती मागणी लक्षात घेऊन लोणी काळभोर (ता. हवेली, जि. पुणे) येथील किरण काळभोर यांनी लेअर पोल्ट्री उद्योगात चांगला जम बसविला आहे. सुरुवातीला कोळभोर कुटुंबीयांनी एक एकर शेती खरेदी केली होती. शेतीतून अपेक्षित आर्थिक उत्पन्न मिळत नसल्याने पूरक उद्योगातून आर्थिक उत्पन्न वाढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला.यातूनच कुक्कुटपालन व्यवसायाला सुरुवात केली. किरण काळभोर यांनी २०१४ मध्ये लेअर पोल्ट्री व्यवसायाची निवड केल्यानंतर तांत्रिक माहिती घेण्यासाठी अनेक ठिकाणी भेटी दिल्या. या भेटीतून त्यांनी नवीन तंत्रज्ञानाची माहिती घेतली. या व्यवसायातील बारकावे समजून घेत ब्रॉयलर आणि लेयर अशा दोन्ही प्रकारच्या पोल्ट्री व्यवसायाचे व्यवस्थापन आणि आर्थिक उलाढालीचा अभ्यास केला.

शेडसाठी लागणारी जागा, व्यवस्थापन खर्च, खेळते भांडवल, विक्रीचे नियोजन यातील बारकावे समजून शहरातील दुकानदारांच्याकडून अंड्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन लेअर पोल्ट्री सुरू करण्याचा निर्णय घेतला. व्यवसाय सुरू करताना आर्थिक अडचणी आल्या होत्या. त्यावर मात केली. तसेच खर्च अधिक असल्याने बँकेकडून कर्ज घेऊन लेअर पोल्ट्री व्यवसायाला गती दिली.



शेडची उभारणी

किरण काळभोर यांनी २०१४ मध्ये पहिल्या टप्प्यात ६२ फूट बाय ४०० फूट आकाराची पोल्ट्री शेड तयार केली. शेडची उभारणी पूर्ण झाल्यानंतर शास्त्रीय पद्धतीने लेअर कोंबड्यांच्या व्यवस्थापनासाठी योग्य आकाराचे पिंजरे बसविले. या शेडमध्ये सुमारे ३० हजार लेअर कोंबड्यांचे चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन सुरू केले. पोल्ट्री उद्योगात चांगला जम बसल्यानंतर दोन वर्षांनी ६२ बाय ४०० फूट आकारमानाच्या दुसऱ्या लेअर फार्म शेडची उभारणी केली. सध्या दोन्ही शेड मिळून ६० हजार लेअर कोंबड्यांचे संगोपन केले जाते. कोंबडी पिले खरेदी केल्यानंतर पहिले १२ आठवडे स्वतंत्रपणे एका शेडमध्ये ठेवली जातात. त्यासाठी ४५ बाय ७०० फुटांचे शेड उभारण्यात आले आहे. या शेडमध्ये व्यवस्थितरीत्या संगोपन, खाद्य व्यवस्थापन आणि लसीकरण केल्यानंतर मुख्य शेडमध्ये कोंबड्यांना नेले जाते. १८ आठवड्यांपासून कोंबडी अंडी देण्यास सुरुवात करते. सुरुवातीच्या काळात अंडी लहान असल्याने दरही कमी असतो. परंतु २५ व्या आठवड्यापासून अंड्याचा आकार चांगला मिळण्यास सुरुवात होते. त्यामुळे दरही चांगला मिळतो. साधारणपणे एक कोंबडी ८५ ते ९० व्या आठवड्यांपर्यंत अंडी देत राहते.

खाद्याचा पुरवठा : सुरुवातीचे दोन महिने कंपनीचे कोंबडी खाद्य वापरण्यात आले. परंतु ओळखीचे पोल्ट्रीचालक आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार किरण काळभोर यांनी स्वतः कोंबडी खाद्य बनवण्याचा निर्णय घेतला. दहा लाख रुपये किमतीची यंत्रणा विकत घेतली. त्यानंतर फीडसाठी लागणारे घटक विकत घेऊन स्वतः खाद्य निर्मितीला सुरुवात केली. यामुळे प्रति किलोमागे एक ते तीन रुपयांपर्यंत बचत होऊ लागली. सुरुवातीला कोंबड्यांना मजुरांकरवी खाद्य देत असल्यामुळे साधारणपणे दोन ते तीन तास वेळ जायचा आणि फार कष्ट जाणवत होते. तसेच मजूरटंचाईचा सामना करावा लागला. त्यामुळे कोंबड्यांना खाद्य देण्यासाठी आधुनिक यंत्रणा पोल्ट्री शेडमध्ये बसविण्यात आली. त्यामुळे कोंबड्यांना आठ ते दहा मिनिटांमध्ये खाद्य देण्याचे काम पूर्ण होऊन वेळेची बचत होऊन त्रासही कमी झाला.

पाण्याची योग्य सोय

पोल्ट्रीला पाणीपुरवठा होण्यासाठी विहिरीची व्यवस्था आहे. या पाण्याची सातत्याने प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. त्यानुसार पाण्याची गुणवत्ता चांगली ठेवली जाते. कोंबड्यांना योग्य गुणवत्तेचे पाणी मिळेल यापद्धतीने नियोजन केले जाते. त्यासाठी शेडमध्ये तीन टाक्या बसविण्यात आल्या आहेत. टाक्यांद्वारे स्वयंचलित निपल सिस्टिम पद्धतीने कोंबड्यांना पाणी पिण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अंड्यांचे उत्पादन आणि विक्रीचे नियोजन

सुरुवातीच्या काळात अंड्यांचे उत्पादन कमी होते. परंतु हळूहळू त्यात वाढ झाली. सध्या दोन्ही शेड मिळून दररोज ५५ हजार अंडी उत्पादन होत आहे. त्यात काही वेळा खराब अंडी होण्याचे प्रमाण असले, तरी ते अत्यंत नगण्य आहे. सुरुवातीला अंडी विक्रेत्यांबरोबरीने करार करण्यात आला. सध्या पाच विक्रेत्यांच्या माध्यमातून अंड्यांची विक्री केली जाते. ही सर्व विक्री फार्मवर केली जाते. त्यामुळे वाहतूक खर्च, वेळेची बचत होत आहे. याशिवाय पुण्यातील मॉलमध्ये आकर्षक पॅकिंगमध्ये अंड्यांची विक्री केली जाते. यासाठी 'श्रीमंत अंबरनाथ पोल्ट्री' या नावाचा ब्रँड तयार केला आहे.अंड्यांचे दररोज दर बदलत असतात. त्यामुळे ग्राहकांच्या मागणीनुसार कमीअधिक दराने विक्री करावी लागते. साधारणपणे वर्षभराच्या सरासरीनुसार प्रति नग ३ ते ६ रुपयांपर्यत दर मिळतो. बाजारपेठेतील पुरवठ्यानुसार दररोज दर बदलत असतात. पोल्ट्री व्यवसायात कोंबड्यांचे व्यवस्थापन, वाहतूक, खाद्य, मजूर, वीजबिल असा मोठा खर्च होतो. हा सर्व खर्च वजा जाता महिन्याला सरासरी तीन लाखांचा नफा होता. हा नफा बाजारपेठेतील दरावर अवलंबून असतो. काही वेळा अपेक्षेपेक्षा कमी दरानी अंडी विकली जातात. परंतु पोल्ट्रीचे काटेकोर व्यवस्थापन ठेवून खर्च मर्यादित ठेवण्यावर काळभोर यांनी भर दिला आहे. त्यामुळे बँक कर्ज परतफेड व्यवस्थित करता येते.

कोंबड खताची विक्री : पोल्ट्रीमधून कोंबडी खत चांगल्या प्रतीचे मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्याकडून यास वाढती मागणी आहे. परिसरातील अनेक शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात कोंबडी खताची खरेदी करतात. पूर्ण वर्षभराच्या कालावधीत साधारणपणे आठ लाख रुपयांची खत विक्रीतून उलाढाल होते.

# घाणीच्या विळख्यात बसलेले लोक शहराला काय स्वच्छ ठेवणार?







## परळी नगर पालिकेचे गुत्तेदार व कर्मचारी भ्रष्टाचारात गर्क

## नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर खेळ - राजेभाऊ फड

## १०० ते १५० कर्मचारी स्वच्छता विभागात काम करतात मात्र नोंद ५०० लोकांची

परळी। प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहर हे ज्योतिर्लिंग क्षेत्र असून वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेले शहर आहे. देशभरातील लाखो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. इथली व्यवस्था आणि ओळख घेऊन ते बाहेर जातात. याचे नगर पालिकेला कदाचित भान राहिलेले नाही अशी अवस्था झालेली दिसतीये. शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून यामुळे रोगराई वाढत चालली आहे. शहराची पालक संस्था असलेल्या नगर पालिकेची वास्तूचं घाणीच्या विळख्यात आहे. कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या या इमारतीची बकाल अवस्था झालेली आहे.

### पालिकेच्या इमारतीचा कचरा डेपो!

परळी वैजनाथ शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. एकीकडे शहरात स्वच्छतेची स्थिती गंभीर असताना दुसरीकडे नगर पालिकेच्या इमारतीचा कचरा डेपो झाल्याचे चित्र आहे. हे असले निष्क्रिय प्रशासन काय स्वच्छता करणार आणि नागरिकांची काय काळजी घेणार? याबाबत चिंता वाटत असल्याचे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे प्रशासक असलेल्या मुख्याधिकारी कार्यालयाच्या भिंतीच थुंकून थुंकून लालेलाल झालेल्या आहेत. इमारतीच्या आवारातच घाणीचे साम्राज्य पसरल्याचे दिसून येत आहे.

म्हणूनच घाणीच्या साम्राज्यात बसून काम करणारे लोक शहराची काय स्वच्छता करतील? अशी शंका वाटते. भ्रष्टाचारात आणि मलिदा करण्यात गुंग आणि गर्क असलेल्यांना नागरिकांच्या आरोग्याचे काहीही देणेघेणे नसल्याचा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी नगर पालिकेच्या भ्रष्ट कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरी प्रश्नांकडे नगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने त्यांच्या भ्रष्टाचाराचा पाढा जनतेसमोर वाचून जनजागृती करण्याचा इशारा फड यांनी दिला आहे. नागरी समस्यांबाबत त्यांनी अनेकवेळा नगर पालिका प्रशासनाला पत्रव्यवहार करून सुधारणा करण्याबाबत सूचित केले. मात्र भ्रष्टाचाराची कीड लागलेले निगरगट्ट कर्मचारी मात्र त्यांच्याच धुंदीत वागत असल्याचे दिसून येते. परळी नगर पालिका शहर स्वच्छतेसाठी महिन्याकाठी जवळपास ३० लक्ष रुपये खर्च करते. ५०० कर्मचारी स्वच्छता विभागात काम करतात असे कागदोपत्री दाखवले जाते, मात्र वास्तवदर्शी फक्त १०० ते १५० लोकच काम करत असल्याचे नेहमी दिसते. बाकीच्या काही बोगस लोकांची नावे लावून पैसे उचलण्याचे प्रताप केले जात आहेत. शहरातील अनेक भागांतील नाल्या तुंबलेल्या आहेत, रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे, शहरातील मोठ्या ओढ्यातील तुंबलेला कचरा काढला जात नाही, डास प्रतिबंधक फवारणी केली जात नाही, मोंढा भागात आणि व्यापरपेठेत सर्वत्र दुर्गंधी पसरल्याचे चित्र आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य दिवसेंदिवस धोक्यात येत असून रोगराई वाढत चालली आहे. भ्रष्टाचारात आणि फुकटचे पैसे लाटण्यात गुंग आणि गर्क असलेले नगर पालिका प्रशासन शहराची काय स्वच्छता करणार? असा सवाल राजेभाऊ फड यांनी विचारत नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. वेळीच या परिस्थितीत सुधारणा केली गेली नाही तर यावर तीव्र लोकआंदोलन उभारणार असल्याचा इशारा दिला आहे.

## मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण शिबिर



बीड। प्रतिनिधी

मानसिक आजारी व बौध्दिक व दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण दोन दिवसीय शिबीर जिल्हा न्यायालयात झाले असून यात मान्यवरांचे माहिती पुर्ण मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ. मुजाहिद मोहम्मद जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, जी.जी.सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ॲड.पि.व्ही.दगडखैर मुख्य विधी सहायक संरक्षक लोकअभिरक्षक कार्यालय बीड, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, ॲड.ए.एस.कदम विधीसहाय संरक्षक, अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, महेश कानपाठक, किरण नन्नवरे हे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई, यांच्या सुचनेनुसार जिल्हयामध्ये मुलासांठी कायदेशीर मदत सेवा केंद्र प्रशिक्षण शिबीराचे आयोजन हे जिल्हा न्यायालयात दि. २३.१२.२०२४ व २४.१२.२०२४ या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.जी.जी.सोनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले मनोन्याय या समितीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तीकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमूळे मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींना न्याय मिळवणे सोपे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ॲड.पि.व्ही.दगडखैर यांनी मानसिक आरोग्याकरीता कायदेशीर सूविधा याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. ॲड. अमित कदम हे मार्गदर्शन करताना म्हणाले की,मानसिक आजार असलेल्या व्यक्तीचे हक्क आणि बौध्दिक दृष्टया कमकुवत असलेल्या व्यक्ती करीता कायदेशीर मदत यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी तज्ञ म्हणुन मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याची तानतनावाची परिस्थिती व धावपळीचे जीवन यामध्ये मानसिक आजारी रूग्णांची संख्या वाढत असुन त्यावर तात्काळ उपचावर घेणे हे गरजेचे आहे. मानसिक आजार लपविल्यामूळे वाढतो. जर आपण वेळेवर उपचार घेतला तर, आपणास फायद्याचे ठरते. जिल्हा शासकीय रूग्णालय बीड येथे मानसिक रूग्ण यांचे उपचार केले जातात. तज्ञ डॉ. सुदाम मोगले यांनी आपला समाज व आपली सामाजिक परिस्थीती मानसिक आरोग्याच्या बाबतीत जागरूक नसल्यामूळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. असे सांगत, प्रत्येक व्यक्तींनी मानसिक आरोग्याच्या बाबतीत सजग राहून त्यासंदर्भातील कायदे, मानसिक आरोग्याच्या सुविधा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने स्थापन झालेल्या मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तिंकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तरी आपल्या जिल्हयात यासंदर्भात काम सुरू झालेले असून याचा सर्वानी लाभ घ्यावा, अे आवाहन त्यांनी यावेळी केले. तत्वशील कांबळे यांनी मार्गदर्शन करत सांगितले, बालकांचे मानसिक आरोग्य जपणे खुप गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक बालक हा समान असुन त्यांचे शारीरीक व मानसिक आरोग्याची तपासणी गरजेनुसार करून घ्यावी. मिथुन जोगदंड यांनी विधीदुताचे (अधिकारमित्र) यांचे कार्यप्रणाली कशी असते याची सविस्तर माहिती दिली. मदतीसाठी टोल फ्री नंबर १५१०० कायदेशीर मदतीसाठी टोल फ्री नंबर सागितला टेलि मानस चे टोल फ्री क्रमांक १४४१६ ची माहिती दिली. अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड यांनी मनोरूग्ण व्यक्तीला सहानुभूतीपुर्वक हाताळले पाहीजे. मानसिक आजार याला जागतिक पातळीवर आजाराची मान्यता मिळाली आहे. त्यामूळे त्यावर ईलाज होऊ शकतो आणि मानसिक रूग्ण पुर्णपणे बरा होऊ शकतो. ही बाब लक्षात ठेवून मनोरूग्णाशी चांगल्या तऱ्हेने वागले पाहिजे. या शिबीरात जिल्हयातील तालुका विधी सेवा प्राधिकरणातील विधीदुत उर्फ अधिकार मित्र हे बहुसंख्येने उपस्थित होते.

## पालकमंत्री बीडचाच हवा ; बाहेर जिल्ह्यातील पालकमंत्र्याच्या कार्यकाळात बीडकरांनी भोगलंय

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्याला कायम अवकाळी पावसाचा तडाखा, गारपिटीने शेतकऱ्यांचे नुकसान तर संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात सर्वाधिक गेल्या १ जानेवारी २०२४ ते ३१ नोव्हेंबर २०२४ दरम्यान ११ महिन्यात १७४ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. सध्या बीड जिल्ह्याला पालकमंत्री बाहेरून मिळणार अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळत आहेत. मात्र आम्हा बीडकरांचा मागील अनुभव पहाता जेव्हा मागच्या सरकारमध्ये बाहेर जिल्ह्यातील बीडचे पालकमंत्री अतुलजी सावे असताना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले होते. त्यामुळे आम्हाला दि.१० एप्रिल २०२३ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर " " निष्क्रिय पालकमंत्री हटाव आंदोलन " करावे लागले होते. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितजी पवार यांनी बीड जिल्ह्यातील जनतेचा विचार करून बीडचा पालकमंत्री बीड जिल्ह्यातील असावा.

बीड जिल्ह्यासाठीचा पालकमंत्री अजुनही जाहीर झाले नसल्याने जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊ शकली नसल्याने शिल्लक निधी कसा खर्च करायचा आणि उर्वरित निधीची कशी मागणी करायची यावर शिक्कामोर्तब झालेले नाही.बीड जिल्ह्यासाठी चालु आर्थिक वर्षात ४८४ कोटी रूपयांचा वार्षिक निधी मंजूर झाला खरा परंतु राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडून केवळ १९० कोटी रुपये जिल्ह्याच्या पदरात आले.१९० कोटी रूपयांपैकी ३ महिन्यात ११० कोटी रुपये खर्च झाले असुन त्यातील ७० कोटी रुपये शिल्लक आहेत.मंजुर असलेल्या एकुण ४८४ कोटी रूपयांपैकी अजूनही २९४ कोटी रुपये राज्य सरकारकडून बीड जिल्ह्याला मिळालेले नाहीत. बाहेर जिल्ह्यातील पालकमंत्री असतील तर नियोजन समितीच्या बैठका वेळेवर होत नाहीत असा बीडकरांचा अनुभव आहे त्यामुळे बीडचाच पालकमंत्री करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## प्रणव झांबरेची शालेय राज्य सॉफ्टबॉल निवड चाचणीसाठी निवड



बीड। प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छ. संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा १४ वर्ष मुले/मुली दि: ०८/१०/२०२४ आर्य चाणक्य विद्याधाम जटवाडा, छ. संभाजीनगर येथे विभागीय स्पर्धा व निवड चाचणी पार पडली. या निवड चाचणी मध्ये गुरुकुल पब्लिक स्कूलचा खेळाडू प्रणव झांबरे ने सहभाग नोंदवला होता. या निवड चाचणी मध्ये नेत्रदिप कामगिरी करत त्याची शालेय राज्य स्तरीय निवड चाचणी साठी निवड करण्यात आली. राज्य स्तर स्पर्धा व निवड चाचणी यवतमाळ येथे दि. २७ ते २९ डिसेंबर या तारखेस होणार आहे. व याच ठिकाणी शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी साठी महाराष्ट्राचा संघ निवडणार आहेत.

या निवडीबद्दल सॉफ्टबॉल प्रशिक्षक किशोर काळे सर (राष्ट्रीय खेळाडू) यांचे प्रणव झांबरे यास मोलाचे मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी - मा.श्री.अरविंद विद्यागर सर, सॉफ्टबॉल जिल्हाध्यक्ष - दिनकर थोरात सर, सॉफ्टबॉल राज्य क्रीडा मार्गदर्शक - सतीश राठोड सर रेवनाथ शेलार सर, गुरुकुल शाळेच्या प्राचार्या - ऋतुजा गाडीवान मॅडम यांनी खेळाडू प्रणव झांबरे व प्रशिक्षक किशोर काळे सर व क्रीडा शिक्षिका काशीद मॅडम यांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## स्व.झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन व कथा महोत्सवाचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

बीड शहरामध्ये गेल्या २० वर्षाची परंपरा असलेला स्व.झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान बीड आयोजित भव्य राज्यस्तरीय कीर्तन व कथा महोत्सव दि.३१ डिसेंबर २०२४ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत रोज सकाळी १० ते सायं.१० या वेळेत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तन व कथा महोत्सवाचा बीडकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन स्व.झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

गेल्या २० वर्षापासून खटोड प्रतिष्ठानने ही परंपरा अखंड चालू ठेवलेली आहे. भारतीय संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी तरुण मनावर विविध संतांचे विचार बिंबवण्याकरीता २००४ साली कीर्तन महोत्सवाची राष्ट्रीय कीर्तनकार वै.भरतबुवा रामदासी यांच्या कल्पनेतून सुरुवात झाली होती. याचे कारण होते, ३१ डिसेंबर हे पाश्चात्य संस्कृतीचे तरुण पिढीवर परिणाम होऊ नये या करीता हा अल्पसा प्रयत्न आपल्या बीड शहरात सुरु केला होता. या दरम्यान मावळत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत कीर्तन, कथेच्या माध्यमातून संत वचन, भारतीय संस्कृतीचे जतन व्हावे या करीता वारकरी संप्रदायाचे विचार आज पर्यंत अखंडपणे चालू आहेत. याही वर्षी ३१ डिसेंबर २०२४ ते ७ जानेवारी २०२५ पर्यंत २ कथा व १२ कीर्तने व भारुड याचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिध्द कीर्तनकार व कथाकार आपली सेवा देणार आहेत. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.राधाकृष्ण महाराज अकोलकर (संभाजीनगर), दुपारी ३ ते ५ या वेळेत ह.भ.प.अंजलीताई केंद्रे (लातूर), सायं.७ वा. ह.भ.प.माणिक महाराज रेंगे यांची कीर्तनसेवा होणार आहे. तसेच १ जानेवारी २०२५ पासून सकाळी १० वा.पासून ह.भ.प.अनुराधा दिदी (पंढरपूरकर) यांच्या संगीतमयकथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व बीडकरांनी ३१ डिसेंबर ते ७ जानेवारी २०२५ पर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रोज सकाळी १० ते सायं. १० पर्यंत विविध कीर्तने आणि संगीतमय कथा संपन्न होणार आहे. बीडकर व भाविक-भक्तांना यशवंतराव चव्हाण नाटयगृह येथे प्रवेश मोफत असणार आहे. तरी बीडकरांनी याचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन स्व.झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

## मानवलोक येथे डॉ.द्वारकादास लोहिया लोकसहभाग पुरस्कार व राष्ट्रीय जल परिषद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रीय जलपरिषदेचे उद्घाटन श्री नंदकिशोर मुंदडा, डॉ.राजेंद्रसिंह राणा भाईजी, डॉ. दत्ता देशकर, श्री अनिकेत लोहिया, श्री.अशोकरावजी देशमुख, श्री जयाजी पाईकराव, डॉ सुमंत पांडे व इतर मान्यवरांनी जल कुंडामध्ये पाणी टाकून केले.जल परिषदेमध्ये प्रस्ताविक करताना मानवलोकचे कार्यवाह आणि आयोजक अनिकेत लोहिया यांनी यावर्षी जरी अनेक भागात चांगला पाऊस पडला आहे तरीही जलपरिषद आयोजित का केलेली आहे असा प्रश्न अनेकांना पडू शकतो पण जलपरिषद आयोजना मागील भूमिका त्यांनी विशद केली. ते म्हणाले की यंदा चांगला पाऊस झाला आहे .त्यामुळे आपली सर्वांची जबाबदारी वाढते आहे. यावर्षी जमिनीवर पाण्याचा सुकाळ असला तरी हे पाणी भूगर्भा पर्यंत कसं पोहोचेल. भूजलस्तर कसा वाढेल या दृष्टीने काम करणं गरजेचं आहे. त्यामुळेच यावर चर्चा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मानवलोक गेल्या ४० वर्षापासून जलसंधारण, मृदा संधारण, नदी पुनर्जीवन अशा पाण्याच्या क्षेत्रात कार्यरत आहे. चाळीस वर्षांपूर्वी डॉ. द्वारकादास लोहिया आणि शैला भाभी लोहिया यांनी स्थापन केलेल्या या संस्थेचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत त्याचा विस्तार करत आहोत.

जल संवाद मासिकाचे संपादक दत्ता देशकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांमध्ये पाऊस उशिरा येतो आणि लवकर परतत आहे. मराठवाड्यामध्ये पावसाचे दिवसही कमी होत आहेत .तो आपल्या मर्जीप्रमाणे पडत आहे. कमी काळात वेगाने पाऊस येतो राष्ट्रीय जल परिषदेचे उद्घाटक श्री नंदकिशोर मुंदडा यांनी मानवलोक संस्थेने केलेल्या विविध कामांची माहिती तसेच जलपरिषद घेण्यामागचा उद्देश विशद केला. शासन स्तरावरील पाणी आडवा पाणी जिरवा तसेच जलस्वराज्य, जलयुक्त शिवार अशा विविध योजनांद्वारे पाण्याचे महत्व लोकांना शिकवले जाते. येणाऱ्या काळात आपण आपल्या स्तरावर पाणी व्यवस्थापनासाठी योग्य पावले उचलण्यासाठी प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले तसेच बाबूजींनी केलेल्या विविध



कामांची माहिती उपस्थिताना दिली. भूजल अभ्यासक श्रीनिवास वडगबाळकर आणि रोहन पवार म्हणाले की, निसर्ग लहरी आहे,पाऊस जर पडण्याच स्वरूप बदलत असेल तर आपल्याला वागणुकीत बदल करावा लागेल. यशदा येथील जलसाक्षरता केंद्राचे माजी संचालक डॉ. सुमंत पांडे म्हणाले की पाणी जपून वापरा. पाण्याचं पुनर्भरण करा .पाण्याची नीट वापर करा .त्याचं नियोजन करा .उपलब्ध पाण्याचा ताळेबंद मांडला गेला पाहिजे त्यानुसार त्याचा वापर शेती पाणी साठी झाला पाहिजे तरच आपण पाण्याच्या संकटापासून वाचू शकू.

जल व्यवस्थापन आणि महिलाचा सहभाग या सत्रा मध्ये मेधा जोशी यांनी कुठलीही गोष्ट काटकसरीने वापरायची शैली महिलांच्याकडे असते .त्यानुसार पाण्याचा कसा जपून वापर करायचा याचं तंत्र ही महिलांकडच आहे. त्यामुळे पाण्याच्या नियोजना संदर्भातील निर्णय घेताना गाव कारभाऱ्यानी महिलांना विचारात घ्यायला हवं. गावातील पाणीपुरवठा स्वच्छता समिती तयार करताना महिलांना स्थान मिळायला हवं .सरकारने जरी शासनादेश काढून या समित्यामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व ५० टक्के पेक्षा जास्त असणं गरजेचं आहे असे सांगितले.कृषिभूषण श्री विजय अण्णा बोराडे यांना डॉ .द्वारकादास लोहिया (बाबूजी) लोकसहभाग पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते म्हणाले की आज एका गावात पाऊस सारखा पडत नाही. दर कोसाला त्याचे रूप वेगळे आहे. यशदाचे संचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले की २०३० पर्यंत देशातील सर्व ग्रामपंचायतीना शाश्वत विकास ध्येय गाठायचे आहे. ज्यात जलसमृद्ध गाव असेल. जलपरिषदेचा समारोप डॉ.राजेंद्र सिंह (भाईजी) यांच्या मार्गदर्शनाने झाली ते म्हणाले की हवामान बदलाचे परिणाम भयानक आहेत. पण शेतकऱ्यांना याची अजून खबर नाही. जलपरिषदेमध्ये डॉ अजित गोखले डॉ प्रदीप भलगे व शरद घुगे यांनी समनाई पाणी वाटप कशा पद्धतीने करता येईल व येणाऱ्या काळात प्रदूषण कशा पद्धतीने रोखता येईल आणि जल व्यवस्थापन यामध्ये प्रदूषण विरहित जल कसे रोखता येईल याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास समृद्धी दिवाणे गटविकास अधिकारी आंबेजोगाई,डॉ. प्रकाश जाधव, अक्षय मुंदडा, श्कारी नरेद्रिशर चुग , श्नारी रमाकांत बापू कुलकर्णी , डॉ. संजय गवई, विविध गावातील सरपंच यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच रिटा रॉद्रीग्स लिखित चंबळ खोऱ्यातील जलकांती या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रचलन डॉ. रमा पांडे आणि प्रा. सुकेशिनी जोगदंड, डॉ. नजीर शेख यांनी केले तर आभार डॉ. हनुमंत साळुंके यांनी मांडले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानवलोकचे कार्यवाह श्री अनिकेत लोहिया यांच्या मार्गदर्शनाखाली व समन्वयक डॉ. हनुमान साळुंके, अण्णासाहेब रोहम अरुण जोशी अतुल कुलकर्णी व मानवलोक चे कार्यकर्ते आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षेकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# आता वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट असणार

**बीड । प्रतिनिधी**

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोणातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट ( ) बसविणे आवश्यक असून मा. सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशही दिलेले आहेत. याअन्वये बीड जिल्हयातील सर्व वाहन धारकांना त्यांच्या वाहनांना एचएसआरपी बसविण्याकरीता सूचना उप प्रादेशिक परिवाहन कार्यालय, बीड यांच्यावतीने जारी करण्यात आलेल्या आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० अन्वये महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना एचएसआरपी




बसविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

बीड जिल्ह्यात एचएसआरपी पुर्ण करण्यासाठी अंगीकारलेली कार्यवाही

बीड जिल्हयाकरीता / ही एजंसी निश्चीत करण्यात आलेली असून एचएसआरपी बसविण्याकरीता बुकींग पोर्टल https:// maharashtra hsrp.com हे पोर्टल निश्चीत करण्यात आलेले आहे. वाहन धारकांनी वरील पोर्टलवर बुकींग करुन त्यांच्या सोयीप्रमाणे अपॉइंटमेट घेवून एचएसआरपी बसवून घेण्यात यावी.

वाहन धारक बीड कार्यालयातील नोंदणी धारक नसला तरी काही कामा निमित्त बीडमध्ये वाहन वापरत असेल तरी देखील सदर वाहनास एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे. सदर एचएसआरपी बसविण्याकरीता पुढील प्रमाणे शुल्क हे जीएसटी वगळून आकारण्यात येणार आहे.

वाहनाचे प्रकार-

दुचाकी / ट्रॅक्टर ४५०/-, तीनचाकी ५००/- इतर सर्व वाहने ७४५/-

वाहनाधारकांना त्यांच्या वाहनांवर एचएसआरपी संदर्भात काही तक्रार असल्यास संबंधीत सेवापुरवठा धारकांच्या पोर्टलवर तसेच बीड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार दाखल करुन शकतात. याव्दारे बीड जिल्हयातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट न बसविल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे उतरविणे / दुय्यम प्रम / विमा अदयावत करणे इत्यादी कामकाज थांबविण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी,

याव्दारे एचएसआरपी नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी असलेली वाहने, इत्यादी वाहनांवर कार्यालयाकडून भविष्यात दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, (अ.का.) स्वप्नील माने बीड यांनी कळविले आहे.

## जिल्ह्यातील सर्व सरपंचानीं उद्याच्या मोर्चात सहभागी व्हावे -प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मसाजोग चे आदर्श सरपंच आपले सहकारी संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी बीड मध्ये उद्या काढण्यात येणाऱ्या मोर्चात जिल्ह्यातील सर्व आजी माजी सरपंच उपसरपंच यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र चे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले आहे संतोष देशमुख यांच्या सारख्या आदर्श सरपंचची हत्या होणे ही पंचायत राज व्यवस्थित निंदनीय बाब आहे बीड जिल्ह्यातील गुंडगिरी गुंडगिरी संपली पाहिजे आणि आपले सहकारी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे आज संतोष देशमुख यांच्यावर वेळ आली उद्या ती आपल्यावरही येऊ शकते हत्या होऊन अनेक दिवस झाले तरीही आरोपी सापडत नाहीत हे सरकारचे अपयश आहे मात्र देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळे पर्यत सरपंच परिषद स्वस्त बसणार नाही असे ही काकडे यांनी प्रसिद्ध दिलेल्या निवेदनात म्हटले आहे



# बीड जिल्ह्यातील लोक अधिक प्रेमळ

## तत्कालीन उपजिल्हाधिकारी प्रशांत शेळके यांनी केले बीडच्या चांगुलपणाचे समर्थन

बीड । प्रतिनिधी

बीड चे तत्कालीन जिल्हाधिकारी सदानंद कोचे यांनी राहुल कुलकर्णी यांनी घेतलेल्या मुलाखतीत बीडमध्ये पहिल्यापासूनच गुन्हेगारी आहे असा सूर धरला याला राहुल कुलकर्णी यांनीही दुजोरा दिला. काही गोष्टी बीडमध्ये चांगल्या नसतीलही पण बीड मधले लोक अधिक प्रेमळ आहेत आणि सर्वसामान्य माणूस खूप चांगला आहे. थोडेफार राजकारणात डावे-उजवे होत असते मात्र या लोकांना जीव लावला तर हे लोक खूप चांगले आहेत. सर्वसामान्य माणूस खूप प्रेमळ आहे. महाराष्ट्रात असे लोक कुठेही सापडणार नाहीत. अशा शब्दात बीडचे तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत शेळके यांनी बीडच्या सर्वसामान्य माणसाच्या चांगुलपणाचे समर्थन केले .



बीड जिल्हया विषयी बोलताना तत्कालीन उपजिल्हाधिकारी प्रशांत शेळके म्हणाले की बीड विषयी कुणीही काही उलटे सुलटे बोलले की माझा माथा ठणकतो. मी स्वतः बीड मध्ये ७/८ वर्ष उपविभागीय अधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. मान्य आहे की, अवैध धंदे किंवा काही अमानवीय घटना घडतात. त्या निंदनीय निश्चित आहेत. पण याचा अर्थ काही मोजक्या लोकांच्या मुळे साऱ्या जिल्ह्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारणे कितपत योग्य आहे ?

बीड मध्ये अधिकाऱ्यांनी शासकीय नोकरीच्या काळात एकदा तरी पोस्टिंग घ्यावीच .आणि काम करून दाखवावे जे बाहेर बसून नावे ठेवतात विशेषतः त्यांनी.

मध्ये गाढवेही काम नीटपणे करतील. पण परिस्थितीत काम करण्यासाठी खरोखरच कस लागतो. एकदा बीड मध्ये काम केले की तो अधिकारी जगात कुठेही काम करण्यास सक्षम होतो.असे म्हणतात.कारण एवढ्या विलक्षण परिस्थितीला तोंड द्यावे लागते ना की तो अधिकारी एक तर काही थोड्या काळात पळ काढतो. नाहीतर तो तोंड देत धाडसी होतो. धाडसी अधिकाऱ्यांना बीड डोक्यावर घेवून नाचते हे कुणी विसरू नये. बीडमधील पान ३ वर

# अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत मटका गुटख्यासह सर्व प्रकारच्या अवैध धंद्याचे थैमान

## नवनीत कॉवत साहेबांनी स्वतंत्र पथक पाठवून अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मध्ये पोलीस निरीक्षक महोदयांच्या कृपा आशीर्वादाने मटक्या गुटख्या सह सर्व प्रकारच्या अवैध धंद्याने थैमान घातले असुन नव्याने पदभार स्वीकारलेले बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी स्वतंत्र पथक पाठवून सुरू असलेल्या अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

मागील अनेक महिन्या पासून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मध्ये मटका, गुटखा, पत्याचे क्लब, गांजा, घावटी दारू, गुडगुडी, बिंगो या सारखे खेळ या सह अन्य प्रकारचे अवैध धंदे मोठ्या प्रमानावर फोफावले असून क्रीडा मंडळाच्या नावाखाली बिनधास्त पणे पत्याचे क्लब सुरू आहेत. हे धंदे चालवणाऱ्या कडून मलिदा घेऊन सुरू असलेल्या अवैध धंद्या मुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आसून हे अवैध धंदे चालवणारी मंडळी नवयुवकाना व्याजाने पैसे देतात आणि वेळेत पैसे परत न दिल्यावर त्यांना विविध प्रकारे टॉर्चर करतात या मुळे काही युवकांनी आपले जीवन संपवल्याच्या तर काहींनी गांव सोडून गेल्याच्या घटना या पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या आहेत.

मागील ८ दिवसा पूर्वीच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने सोमवारी दुपारी अंबाजोगाई शहरा नजीक ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत बुट्टेनाथ दरी मध्ये असलेल्या बनावट दारू बनवण्याच्या कारखान्यावर धाड टाकून आतील यंत्रसामग्री सह ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केल्या मुळे या पंचक्रोशीत एकच खळबळ उडाली आणि प्रश्न उपस्थित झाला तो आज पर्यंत या कारखान्यावर ग्रामीण पोलीस स्टेशन च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यवाही का केली नाही. बुट्टेनाथ हा परिसर येथील डोंगर दऱ्यात असून या परिसरात अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांच्या कृपेने असंख्य घावटी दारू बनवण्याच्या भट्ट्या सुरू आहेत ही गोष्ट आता नवीन राहिलेली नाही. मात्र या परिसरात चक्क बनावट दारू बनवण्याच्या कारखाणा उघडकीस येतो यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाची धाड पडते यात या पथका कडून ३६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला जातो आणि सुरू असलेल्या या कारखान्याची खबर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांना नसावी ही गोष्ट शक्यच नाही.

अंबाजोगाई ग्रामिण पोलीसांच्या कृपेने बुट्टेनाथ परिसरा सह राडी तांडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गावठी दारू बनवण्याच्या भट्ट्या आहेत. या भट्ट्यावर थातूर मातूर कार्यवाही करून स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या

# चक्क पोलीस चौकी समोरच तरुणावर चाकू, कोयत्याने प्राणघातक हल्ला

## अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालय परिसरातील घटना, चौघांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वाढलेल्या गुन्हेगारीचा प्रश्न आता वरचेवर चिंताजनक बनू लागला आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक अजिबात राहिला नसल्याचे दर्शविणारी आणखी एक घटना समोर आली आहे. अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयातील पोलीस चौकीच्या समोरच एका तरुणावर चौघांनी चाकू, कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाची प्रकृती सध्या चिंताजनक आहे.




जमीर उर्फ मुन्ना मोहिद्दीन शेख (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. जमीरचा भाऊ शेख मतीनच्या पान ३ वर



## दिंद्रुडच्या सहाय्यक पोलिस निरीक्षकांनी राबवले ठाणे परिसर स्वच्छता अभियान

दिंद्रुड प्रतिनिधी :-


माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचारी यांनी दिंद्रुड पोलीस ठाणे परिसर स्वच्छता अभियान मंगळवारी राबवले. सकाळी सात ते दहा या वेळेत संपूर्ण पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

सपोनी अण्णाराव खोडेवाड, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी हाती कुदळ-खोरे घेत पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ केला. यावेळी मोठमोठी झाडी झुडपे व अस्वच्छ असलेल्या ठिकाणी जेसीबीचा वापर करून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. आस्थाव्यस्त अपघातग्रस्त पान ३ वर

# सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी धानोरा (बु) येथे कँडल मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मसाजोगचे सरपंच संतोषच देशमुख यांच्या खुन प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात येऊन, कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी डिसेंबर रोजी सायंकाळी मौजे धानोरा बु,ता अंबाजोगाई जिल्हा बिड येथील गावकऱ्यांनी कँडल मोर्चा काढण्यात येऊन सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन प्रकरणाला आता आठरा दिवस उलटले असुन, अद्यापहि मुख्य आरोपींना अटक करण्यात आली नाही.जे आरोपी खुनात आहेत,तेच आरोपी



खडणीय आहेत,या आरोपींचे सीडीआर काढावेत, यामध्ये पोलीसांचेही काय लागे -बांधे आहेत,हे बिड जिल्ह्याच्या नविन एसपीनी तपासावे, तसेच परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या संबंधित पोलिस, अधिकारी यांच्याविरोधात तात्काळ कारवाई करण्यात यावी अशा विविध मागण्या संतप्त नागरिकांनी केल्या आहेत.या कँडल मोर्चा मध्ये धानोरा बु येथील हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांचे सोयाबीन विना अट तात्काळ खरेदी करा

## किसान सभेचे खरेदी- विक्री संघ कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन विना अट तात्काळ खरेदी करावे , या साठी आखिल भारतीय किसान सभेच्या वतीने खरेदी विक्री संघ कार्यालय समोर धारूर येथे बे मुद्दत धरणे आंदोलन करण्यात येत आहे .असे दिलेले प्रसिद्ध पत्रकात किसान सभेचे तालुका सचिव कॉ दादासाहेब सिरसट यांनी माहिती दिली .



या बाबत सविस्तर असे की , धारूर येथील खरेदी विक्री संघ मार्फत सोयाबीन खरेदी केंद्र शासन नियम व आदेशानुसार चालू करून उद्घाटन केले आहे . परंतु शेतकऱ्याचे सोयाबीन खरेदी करणे अनेक प्रकारच्या अटी व शर्ती लावल्या जात आहेत . शेतकरी खरेदी केंद्रावर चक्रा मारीत पान ३ वर

# एसपी ऑफिसमधून पोलिसानेच चोरल्या १० बॅटऱ्या

बीड । प्रतिनिधी

कुंपणच शेत खात आहे; या प्रकरणी सहायक फौजदारासह दुकानदारही ताब्यात जिल्ह्यात आगोदरच कायदा व सुव्यवस्था बिघडललेली आहे. यात आगोदरच पोलिस वादात सापडले होते. हे प्रकरण ताजे असतानाच आता पोलिस अधीक्षक कार्यालयातून तब्बल १० बॅटऱ्यांची चोरी झाली. विशेष म्हणजे, या बॅटऱ्या पोलिसानेच चोरल्या आहेत. याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला असून सहायक फौजदार व दुकानदार यांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. कुंपणच शेत खात असल्याचा प्रकार यानिमित्ताने समोर आला आहे.



अमित मधुकर सुतार (रा.खोकरमोहा ता.शिरूरकासार) व माधव गोरक्षनाथ जानकर (रा.वडगाव गुंदा ता.बीड) असे आरोपींची नावे आहेत. सुतार हे सहायक फौजदार असून जानकार हा दुकानदार आहे. नोव्हेंबर महिन्यात सुतार यांनी तीन बॅटऱ्या चोरी केल्या होत्या. तर २५ डिसेंबर रोजी रात्री साडे दहा वाजेच्यापूर्वी आणखी ७ बॅटऱ्यांची चोरी केली. सुतार हे वायरलेस विभागात कार्यरत आहेत. पोलिस उपनिरीक्षक बाबुलाल यल्लाप्पा जाधव यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक राठोड, कर्मचारी अशपाक सय्यद, परजणे हे करत आहेत.

# सरपंच देशमुख हत्या प्रकरणामुळे माजलगावात दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने होणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या झाली. हे कुटूंब उघड्यावर पडले असुन माजलगाव पत्रकारसंघाच्या वतीने या घटनेचा निषेध करत यावर्षी होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम साध्या पध्दतीने शासकीय विश्रामगृह येथे आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून साजरा करण्यात येणार असल्याचा निर्णय माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आला आहे.

येथील शासकीय विश्रामगृहावर पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते ६ जानेवारीला होणारा दर्पण दिनाचा कार्यक्रम प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या पध्दतीने व दर्पण पुरस्कारासह विवीध पुरस्कार देउन न करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक दायित्व निभावत माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या पुढाकारातुन कायमच समाजातील विवीध घटकांना पुरस्कार देउन गौरविण्यात येत असत परंतु यावर्षी जिल्ह्यामध्ये झालेली सरपंच संतोष देशमुख यांची हत्या या घटनेमुळे अत्यंत साध्या पध्दतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशमुख कुटूंबीयांना माजलगाव तालुका पत्रकार संघ व आ. प्रकाश सोळंके यांच्या पुढाकारातुन विवीध संघटना व समाजातील दानशुर व्यक्तींनी केलेली आर्थिक मदत ४ जानेवारीला मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना देण्यात येणार आहे. ६ जानेवारीचा दर्पण दिनाचा कार्यक्रम हा शासकीय विश्रामगृह याठिकाणी होणार असुन सर्व पत्रकार बांधव व आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत साध्या पध्दतीने होणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान या दरपण दिनाच्या कार्यक्रमांमध्ये आमदार प्रकाश सोळंके पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या बैठकीस तालुका पत्रकार संघाचे पान ३ वर

# मूक मोर्चाला मोठ्या संख्येने उपस्थित रहा -सय्यद सलीम

**बीड । प्रतिनिधी**

ज्याप्रकारे स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे, ही घटना म्हणजे माणूसकीला काळीमा फासणारी आहे. अतिशय निर्दयीपणे स्व.संतोष देशमुख यांना मारण्यात आले आहे. तरीही सर्व आरोपी आणि सुत्रधार आरोपींना अटक करण्यात आली नाही. हा प्रकार निंदनीय असून या घटनेचा निषेध व्यक्त व करण्यासाठी स्व.देशमुख यांना न्याय देण्यासाठी दि.२८ डिसेंबर रोजीच्या भव्य मूक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन माजी आमदार सय्यद सलीम यांनी केले आहे.



दि.९ डिसेंबर रोजी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत अमानुषपणे मारहाण करत हत्या केली गेली. या गुन्ह्यातील सुत्रधार, आरोपी सत्ताधाऱ्याच्या राजाश्रयाला आहेत म्हणून अटक केले जात नाही. ज्याप्रकारे स्व.संतोष देशमुख यांनी जीवे मारले गेले आहे हे कळल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला. हा मुद्दा संपूर्ण हिवाळी अधिवेशनात विरोधी आणि सत्तापक्षातल्या आमदारांनीही हा मुद्दा लावून धरला. आरोपींना अटक करण्याची सभागृहात मागणी केली. ही दुर्दैवी घटना होऊन तब्बल १५ दिवस उलटूनही गुन्ह्याच्या पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ । पान ७

# जेजुरीतील तीन खासगी सावकारांना अटक, चार फरार

**जेजुरी । प्रतिनिधी**

जेजुरी शहरातील आयुष हॉटेलचे मालक रवींद्र ऊर्फ बाळासाहेब पारखे (वय ६३) यांनी खासगी सावकारांच्या जाचाला कंटाळून विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आत्महत्येचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहिली होती. त्यानुसार जेजुरी पोलिसांनी खासगी सावकारी करणार्या सात जणांवर गुन्हा दाखल केला असून, यातील तीन जणांना अटक केली आहे.



जेजुरी पोलिसांनी याप्रकरणी दिलेली माहिती अशी की, जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील हॉटेल आयुषचे मालक रवींद्र ऊर्फ बाळासाहेब दत्तात्रय पारखे यांना सन २०१४ ते दिनांक २४/१२/२०२४ रोजी पर्यंत सासवड (ता. पुरंदर) येथे राहणारे मोहन ज्ञानदेव जगताप (रा. सोपानगर), अक्षय ऊर्फ शिटू चंद्रकात चौखडे (रा. चौखडे आळी), संभाजी विश्वासराव जगताप (रा. त्रिशूल सोसायटी), गिरीश राजेंद्र हाडके (रा. धान्य बाजारपेठ), अक्षय ऊर्फ बाबू महादेव इनामके (रा. तपस्वी बिल्डिंग, ब-ाह्मण आळी) तसेच जेजुरी येथील अनिल विरकर आणि पंकज निकुडे यांनी बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करून व्याजाने व बेकायदेशीर भिशीचे मिळून एकूण १ कोटी ७१ लाख ८९ हजार रुपये रोख रक्कम देऊन, त्याचे व्याज म्हणून २ कोटी ५६ लाख २३ हजार रुपये देऊनही मुद्दल व व्याज देत नाहीत, या कारणावरून वेळोवेळी शिवीगाळ व दमदाटी करून मानसिक त्रास दिला. अक्षय ऊर्फ बाळू महादेव इनामके याने तर जबरदस्तीने पारखे यांची बि-झा गाडी (एमएच १२ एमडब्ल्यू ६५७७) हिसकावून घेऊन पीडित रवींद्र ऊर्फ बाळासाहेब दत्तात्रय पारखे यांना सतत शिवीगाळ व दमदाटी करून मानसिक त्रास दिला. पारखे यांनी याला कंटाळून मंगळवारी (दि. २४) सकाळी हॉटेल आयुषमध्ये विषारी औषध घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सध्या त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी फिर्याद पारखे यांचा मुलगा रोहित रवींद्र पारखे यांनी जेजुरी पोलिस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीनुसार जेजुरी पोलिसांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम ३९, ४५, ४६ व बी. एन. एस ३०८ (२), ३०९ (४), ३५२, ३५१ (२) (३), ३(५) प्रमाणे सात जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

गुन्हा दाखल झाल्यानंतर तत्काळ दोन पोलिस पथके तयार करून गुन्ह्यातील महत्त्वाचे आरोपी मोहन ज्ञानदेव जगताप, संभाजी विश्वासराव जगताप आणि अक्षय ऊर्फ बाबू महादेव इनामके (रा. सासवड) यांना लागलीच ताब्यात घेऊन त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपी अक्षय ऊर्फ बाबू महादेव इनामके याच्याकडून बि-झा गाडी जप्त करण्यात आली आहे. या तीनही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २७ डिसेंबरपर्यंत त्यांना पोलिस कोठडी दिली आहे. उर्वरित आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत. ही कारवाई ग्रामीण पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, बारामती विभागाचे अप्पर पोलिस अधीक्षक गणेश बिराजदार, भोर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी दिलीप शिंदे, जेजुरी पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे, उपनिरीक्षक महेश पाटील, हवालदार अण्णासाहेब देशमुख, विठ्ठल कदम, दशरथ बनसोडे, संदीप भापकर, प्रसाद कोळेकर, सागर बहिरट या पथकाने केली आहे. गुन्ह्याचा तपास सहायक निरीक्षक दीपक वाकचौरे करत आहेत.

# विमानप्रवाशांची गैरसोय टळणार; लवकरच मेट्रो स्टेशन ते विमानतळ विशेष बससेवा

**पुणे। प्रतिनिधी**

शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पीएमपीएमएल या प्रवासी वाहतूकीला पर्याय म्हणून महामेट्रोची सुविधा देण्यात आली. मात्र, महामेट्रोचे जाळे संपूर्ण पुणे शहरात पसरलेली नाही. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरपर्यंत मेट्रोची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे महामेट्रोच्या नजीकच्या स्थानकावरून विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच ज्या ठिकाणी मेट्रो मार्गिका नाही, त्या परिसरापर्यंत मेट्रो स्थानक ते घर परिसर अशी सुविधा सुरू करण्याचा मानस आहे.



त्यासाठी महामेट्रोला एक हजार बसची आवश्यकता आहे. तसेच ही सेवा अल्पदरात द्यायची असल्याने याबाबतचे नियोजन महामेट्रो आणि पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सुरू आहे. लवकरच ही सेवा उपलब्ध करून देणअयात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. चंद्रकात पाटील म्हणाले, वनाज ते रामवाडी ही मेट्रो विमानतळापर्यंत जात नाही, नवीन मार्गिका प्रस्तावित असल्या तरी त्या ठिकाणापर्यंत मेट्रो जाणे अशक्य आहे. यामुळे ज्या ठिकाणी मेट्रो स्टेशन आहे त्या ठिकाणाहून बससेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही बससेवा अल्पदरात असेल, तसेच महामेट्रोच्या स्टेशनवरून घराच्या परिसरापर्यंत विशेष बससेवा देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना प्रवास करताना एकसूत्रीपणा येणार आहे.

२०३० पर्यंत संपूर्ण शहरात मेट्रो

पुणे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मेट्रोकडे सक्षम पर्याय म्हणून पाहिले जाते. शहरात प्रत्येक ठिकाणी मेट्रो मार्गिकांच्या विस्तारासाठी काम सुरू आहे. २०३० पर्यंत पुणे शहरात सर्वच ठिकाणी मेट्रोचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. तसेच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे स्थलांतर करण्याचा विचार सुरू होता. त्यामुळे मेट्रो मार्गिकेच्या मूळ आराखड्यात आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आला नाही, असेही त्यांनी सांगितले.

# मराठी भाषेचा गौरव वाढण्यासाठी कार्य करू-मंत्री उदय सामंत

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी भाषा विभागाने मराठी भाषेचा गौरव वाढेल अशा पद्धतीने काम करतानाच हा विभाग प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने काम करावे, अशी अपेक्षा मराठी भाषा मंत्री उदय सामंत व्यक्त केली.



मराठी भाषा विभाग आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागाचे सहसचिव नामदेव भोसले, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, मराठी भाषा विभागाचे अवर सचिव नितीन डंगारे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक तथा विश्वकोश निर्मिती मंडळाचे प्रभारी सचिव डॉ. शामकांत देवडे, भाषा संचालक विजया डोणीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, विभागाच्या कक्ष अधिकारी ऐश्वर्या गोवेकर आदी उपस्थित होते. सामंत म्हणाले, राज्यभाषेला अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या तामिळनाडू किंवा अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रानेही आपल्या भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून अधिकाधिक निधी मिळावा, यासाठी प्रस्ताव पाठवून गतीने पाठपुरावा करावा. देशातील सर्व बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळांना आमंत्रित करुन मराठी भाषेसाठी काय योगदान देता येईल यासाठी त्यांच्या सूचना जाणून घ्याव्यात. सर्व महाविद्यालयात मराठी भाषा विभागाची प्रकाशने ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. सर्व विद्यापीठातील मराठी भाषा विभागात मराठी भाषा संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी प्रस्ताव करावेत. पुस्तकांचे गाव या संकल्पनेच्या अनुषंगाने त्या त्या जिल्ह्यातील नामांकित लेखकांची नावांची यादी करावी, त्याचप्रमाणे कवितांचे गाव या संकल्पनेवरही काम करावे. शासनाच्या सर्व विभागांच्या प्रदर्शनात मराठी भाषा विभागाचे दालन असले पाहिजे, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

फेब्रुवारीत पुण्यात मराठी संमेलन

दुसरे विश्व मराठी संमेलन २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च असे तीन दिवस पुणे येथे घेण्यात येईल. त्यासाठी विभागाने तयारी करावी. तसेच दिल्ली येथे होणाऱ्या विश्व साहित्य संमेल्लनात मराठी भाषेसाठी एक तास राखून त्या माध्यमातून जागतिक स्तरावर मराठी भाषा जाईल यासाठी प्रयत्न करावेत. राज्यस्तरावर महिला साहित्य संमेलन तसेच विभागनिहाय युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशही मराठी भाषा मंत्री सामंत यांनी दिले.

# नरभक्षक बिबट्या पकडा; अन्यथा गावातून जाऊ देणार नाही ; पिंपळसुटी ग्रामस्थांचा संताप

**शिरूर । प्रतिनिधी**

पिंपळसुटी (ता. शिरूर) येथे मंगळवारी (दि. २४) सायंकाळी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात ४ वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू झाला. या घटनेची तत्काळ दखल घेत वन विभागाने बिबट्या पकडण्यासाठी गाव परिसरात १० पिंजरे लावले आहेत. दुसरीकडे या घटनेनंतर ग्रामस्थांनी बैठक घेत तीव- संताप व्यक्त केला. जोपर्यंत नरभक्षक बिबट्या जेरबंद होत नाही; तोपर्यंत वन अधिकारी, कर्मचार्यांना गावातून बाहेर जाऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली आहे.




बिबट्याने मंगळवारी सायंकाळी रक्षा अजय निकम या चिमुकलीवर हल्ला करत तिला उचलून नेले. दीड तासाच्या शोधानंतर स्थानिकांना तिचा रक्ताने माखलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच बुधवारी (दि. २५) सकाळी वन विभागाच्या वतीने घटनास्थळ परिसरात १० पिंजरे, १० ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले. तर जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहायक उपवनसंरक्षक अमृत शिंदे यांनी घटनास्थळी पाहणी करून अधिकारी व कर्मचार्यांना सूचना केल्या. आमदार ज्ञानेश्वर कटके यांनीही घटनास्थळी दाखल होत निकम कुटुंबीयाचे सांत्वन केले. दरम्यान, ग्रामस्थांनी बैठक घेत या घटनेबद्दल संताप व्यक्त केला. तसेच मागण्यांचे निवेदन वन विभागाला देण्यात आले.

जोपर्यंत नरभक्षक बिबट्या जेरबंद होत नाही; तोपर्यंत गावातून अधिकार्यांनी पिंजरे हलवू नये, तसेच अधिकारी व कर्मचार्यांनीही गाव सोडू नये, त्यांना गावाबाहेर जाऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली. तसेच आम्हाला आता बिबट्याला मारण्याची परवानगी द्या, अशी मागणीदेखील ग्रामस्थांनी या वेळी केली. या परिसरात बिबटे मोठ्या प्रमाणावर आहेत. वन विभागाने बिबटे पकडण्याची मोहीम थांबवू नये, ग्रामस्थांनी वन विभागाला सहकार्य करावे, अशी मागणी श्रीवाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे राजीव फराटे पाटील यांनी केली. शेतीला दिवसा थ-ी-फेज वीज पुरवठा करावा, अशी मागणी बाळासाहेब खळदकर यांनी केली. तर लवकरात लवकर बिबटे जेरबंद केले जातील, असे आश्वासन सहायक उपवनसंरक्षक शिंदे यांनी या वेळी ग्रामस्थांना दिले.

# विसापुरजवळ ५ वर्षांच्या चिमुकलीशी अश्लील चाळे करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याचं निलंबन; गुन्हा दाखल

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला मद्यधुंद अवस्थेत चिमुकलीशी अश्लील चाळे करणाऱ्या नराधम पोलिसाचे अखेर निलंबन करण्यात आलं आहे. सचिन सस्ते असं त्या पोलिस कर्मचाऱ्यांचं नाव असून त्याला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकलेल्या आहेत. त्याच्यावर पॉक्सोसह ट्रॉसिटीनुसार (-trocity) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वी तो एसआरपीएफ मधून पुणे ग्रामीण पोलीस दलात रुजू झाला आहे, यापूर्वी त्याने असे काही प्रकार केलेत का? याचा ही तपास सुरु आहे, विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला एका पोलीस शिपायाने चिमुकलीसोबत अश्लील चाळे केल्याचं समोर आलं आहे. कर्तव्यावर असताना हा पोलीस दारूच्या नशेत होता, याचं नशेत त्याने पाच वर्षीय चिमुरडीसोबत अश्लील चाळे केले आहेत. याप्रकरणी सचिन सस्तेला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हा धक्कादायक प्रकार बुधवारी नाताळ दिवशीचं घडला. नाताळची सुट्टी असल्यानं पर्यटक विसापूर किल्ल्यावर गर्दी करत होते, म्हणून नराधम पोलीस सस्ते तिथं बंदोबस्तावर होता. तिथल्याच एका हॉटेलमधून त्याने भाकरी घेतली आणि जेवण केलं. त्या भाकरीचे बिल द्यायला तो हॉटेलमध्ये आला, तेव्हा मात्र तो दारूच्या नशेत होता. त्यावेळी तिथं पाच वर्षीय चिमुरडीला सस्तेने पाहिलं. लघुशंकेचा बहाणा करून तो हॉटेलच्या मागे गेला आणि चिमुकलीसोबत अश्लील चाळे केले. मुलीने विरोध केला, मग तुला चॉकलेट देतो हे कोणाला सांगू नकोस असं तो तिला म्हणाला. मात्र घडला प्रकार मुलीने आईला सांगितला आणि या नराधम पोलिस रस्तेचं बिंग फुटलं. ज्या लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तो कार्यरत होता, त्याचं पोलिसांनी त्याला अटक केली आहे.



# दोन दिवसीय पहिले 'रोटरी मराठी साहित्य' संमेलन पुण्यात

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंदोत्सव साजरा करण्याबरोबरच मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, मराठी वाचन संस्कृतीचे जतन व्हावे, ती प्रवाहित राहावी या संकल्पनेतून सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या रोटरी क्लबतर्फे ४ आणि ५ जानेवारी रोजी पहिल्या रोटरी डिस्ट्रिक्ट मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती रोटरी प्रांतपाल शीतल शहा, संयोजन समिती कार्याध्यक्ष राजीव बर्वे, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे हे संमेलन होणार असून संमेनलाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील असणार आहेत. तर सावा हेल्थकेअरचे संचालक विनोद जाधव संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. यामध्ये उद्घाटन, समारोप समारंभासह साहित्यिक चर्चा, विविध विषयांवर परिसंवाद, मुलाखती, गप्पा, कविसंमेलन, प्रहसने, सांगीतिक कार्यक्रम तसेच संगीत नाटक अशा विविध उपक्रमांचा समावेश यामध्ये असणार आहे. संमेलनाचे उदघाटन ४ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार चंदू बोर्डे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, नॅशनल बुक ट्रस्टचे विश्वस्त राजेश पांडे, जयंत भावे, उपप्रांतपाल मोहन पालेशा, डि. लर्निंग जिल्हा प्रशिक्षक पंकज शहा, संतोष मराठे, नितीन ढमाले आदी उपस्थित राहणार आहेत.

# ...तर बॅलेटवर निवडणूक घ्यायला अडचण काय? सुप्रिया सुळेंचा सवाल

**बारामती । प्रतिनिधी**

ईव्हीएम मशीनवर मी चार वेळा निवडून आले आहे, त्या मुळे त्याच्यावर मी कसा संशय व्यक्त करु, मात्र अनेक ठिकाणी लोकांच म्हणण अस आहे की त्यांची मते दुसरीकडेच गेली आहेत, जर आपण पारदर्शक काम करत असलो तर ईव्हीएम काय किंवा बॅलेट पेपर काय...सरकारला अड्चण काय आहे, असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.



बारामती तालुक्यातील विविध गावांचा सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी (ता. २६) दौरा केला. या दरम्यान माध्यमांशी त्या बोलत होत्या. लोकांचा आग्रह जर असेल की बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यायला हवी, तर त्यात सरकारला काय अडचण आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मात्र आपण चार वेळा ईव्हीएमवरच निवडून आलो आहे, त्या मुळे त्यावर मी संशय नाही व्यक्त करु शकत असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढते. या मागे अर्थकारण हे मोठे कारण असते, अर्थव्यवस्था यंदा मंदावली आहे, महागाई वाढली आहे, हे सगळच चिंताजनक असून केंद्र व राज्य सरकार या बाबत काय भूमिका घेणार हे पाहण महत्वाच असेल. संसदेच्या अधिवेशनामुळे वर्षातील शंभर दिवस मी तेथे असते, उर्वरित काळात प्रत्येक महिन्यात किमान नऊ दिवस वेगवेगळ्या तालुक्यात फिरुन तेथील लोकांचे प्रश्न समजून घेत त्या नुसार संसदेत आम्ही मुद्दे मांडतो, असे सुळे म्हणाल्या.

दुधाचा भाव वाढवून द्यावा अशी मागणी आहे, अनुदानाऐवजी भाववाढीची त्यांची मागणी आहे. जनाई शिरसाई अपूर्ण कामांसह महागाई व बेरोजगारीबाबत तसेच जीएसटीबद्दलही लोक मुद्दे मांडत आहेत. बीडच्या घटनेत सर्वपक्षीय नेते एकत्र आले व त्यांनी त्या गंभीर घटनेबाबत बोलले हे चित्र मला आशादायक वाटते. राजकारणापलिकडे चर्चा होती आहे, राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून मलाही या बाबत अपेक्षा आहेत.

# पुरंदरमधील १०० महिलांना मिळणार पिंक ई-रिक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

महिला व मुलींना रोजगारनिर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, त्यांना स्वावलंबी, आत्मनिर्भर, सशक्तीकरणास चालना देण्याकरिता राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे पिंक (गुलाबी) ई-रिक्षा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यात १०० महिलांना पिंक ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसाहाय्य व चालविण्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.



ई-रिक्षाच्या किमतीमध्ये सर्व कर, जीएसटी, रजिस्ट्रेशन, रोड टॅक्स आदीचा समावेश असेल. नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, अनुज्ञेय असलेल्या खासगी संस्थांकडून ई-रिक्षा किमतीच्या ७० टक्के रक्कम उपलब्ध करून देण्यात येईल. राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल. लाभार्थीवर १० टक्के आर्थिक भार असेल. कर्जाची परतफेड ५ वर्षे आहे, असे योजनेचे स्वरूप आहे. योजनेसाठी लाभार्थी निवडताना लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक राहील, अर्जदाराचे वय २० ते ४० वर्षांदरम्यान अनिवार्य आहे. अर्जदाराचे बँक खाते आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये ३ लाखांपेक्षा जास्त नसावे. विधवा, घटस्फोटित, राज्यगृहातील महिला, दारिद्ररेषेखालील महिलांनासुद्धा प्राधान्य देण्यात येईल. पिंक ई-रिक्षा योजनेंतर्गत पुरंदर तालुक्यातील १०० महिलांना लाभ मिळणार आहेत. गरजूंनी पंचायत समिती कार्यालय, सासवड येथे संपर्क साधावा, अशी माहिती पुरंदर तालुका महिला व बालसंरक्षण अधिकारी कविता चौरे यांनी दिली

# विद्युतदाहिनीसह वायू प्रदूषण यंत्रणा बसविण्यास मान्यता

**पिंपरी । प्रतिनिधी**

च-होली येथील स्मशानभूमीमध्ये विद्युतदाहिनी बसविणे तसेच बोपखेल आणि ई क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत स्मशानभूमीमध्ये पर्यावरणपूरक वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवण्यात येणार आहे. या विषयासह विकास कामांच्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती बैठकीत मान्यता दिली.



महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत स्थायी समिती सभा पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रवीण जैन यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. शहरातील स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी लाकडाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच झाडे वाचवण्यासाठी स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी विद्युतदाहिनीचा वापर करण्यास प्राधान्य दिले जात आहे. त्यानुषंगाने च-होली येथील स्मशानभूमीत विद्युतदाहिनी बसविण्यात येणार असून त्यासाठी येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

बोपखेल येथील स्मशानभूमीत आणि ई क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील स्मशानभूमीत पर्यावरणपूरक वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येणार आहे. परिसरातील नागरिकांना तसेच अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना धुराचा त्रास होऊ नये यासाठी पर्यावरणपूरक वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.